दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –१७३ | गुरूवार दि.२६ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-173 | Thursday, Dt.26 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## बीड मधील कोर्टात नोटरी वकिलाला केलेल्या मारहाणीच्या निषेधार्थ

# आज महाराष्ट्रातील वकिलांचा न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार

## बुधवारी बीड जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाज ठप्प, वकिलांच्या ठिय्या आंदोलनानंतर गुन्हा दाखल..!


बीड /प्रतिनिधी

मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता बीड जिल्हा न्यायालयाच्या आवारात अँड राम डोंगरे यांना आरोपी राधाकिसन रामचंद्र करपे याने तीन महिला आणि दोन इसम यांना सोबत आणून जबर मारहाण केली.या महाराणी नंतर २०० पेक्षा जास्त वकील बांधव यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण बांगर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन गुन्हा दाखल करण्याची आणि आरोपीला अटक करण्याची विनंती केली. मात्र न्याय मिळाला नाही म्हणून पोलीस अधीक्षकांना भेटले. तेव्हा कुठे केवळ एन सी दाखल झाली. आरोपीला अटक न करता अभय देण्यात आल्याच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यातील वकिलांनी बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार घालत ठिय्या आंदोलन केले. यामुळे अखेर पोलिसांनी नमते घेत आरोपी विरुद्ध रीतसर गुन्हा दाखल केला आहे. मात्र अजूनही आरोपीला अटक केलेली नाही. यामुळे मुंबई हायकोर्टातील ज्येष्ठविधीज्ञ वसंतराव सोळंके यांनी मुंबई येथील महाराष्ट्र शासनाचे महाअधिवक्ता यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत आज गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील वकील बांधव भगिनी न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकून या घटनेचा निषेध करतील असा इशारा दिला आहे.

बीड जिल्हा न्यायालयातील नोटरी वकील अँड राम डोंगरे यांना त्यांच्या टेबल समोर आरोपी राधाकिसन रामचंद्र करपे यांनी आडवी गाडी लावली. ती गाडी बाजूला घेण्याची विनंती अँड डोंगरे यांनी केली असता उलट डोंगरे यांनाच शिवेगाळ करून करपे यांनी अंबिका चौकातील तीन महिलांना आणि दोन इसमांना सोबत आणत अँड राम डोंगरे यांना जबर मारहाण करून जीवे मारण्याची धमकी भर कोर्टात दिली. या घटनेनंतर बीड जिल्हा वकील संघाने शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठून पोलीस निरीक्षक प्रवीण बांगर यांना गुन्हा दाखल करण्यासाठी रीतसर तक्रार दिली. मात्र त्यांनी तक्रार घेऊन सुद्धा गुन्हा दाखल केला नाही केवळ एनसी दाखल करून घेतली आणि उद्धटपणे वकिलांनाच माझ्यावर दबाव आणू नका अन्यथा तुमच्याच विरोधात गुन्हा दाखल करेल अशी भाषा वापरल्यामुळे सर्व वकील बांधवांनी पोलीस अधीक्षक यांना घटनेचे गांभीर्य प्रत्यक्ष भेटून सांगितले. मात्र तरीसुद्धा गुन्हा दाखल झाला नाही. त्यामुळे घटनेच्या दुसऱ्या दिवशी बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी बीड जिल्हा न्यायालयातील वकिलांनी न्यायालयाच्या पायरीवर बसून ठिय्या आंदोलन करत न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकला.बीड येथील वकिलांच्या न्याय मागणीला पाठिंबा देत बीड जिल्ह्यातील सर्व न्यायालयातील वकिलांनी न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकून आरोपीला तात्काळ अटक करावी आणि त्यांच्या विरोधात रीतसर गुन्हा दाखल करावा अशा मागण्या त्या त्या ठिकाणी केल्या. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ज्येष्ठविधीज्ञ अँड वसंतराव सोळंके यांनी मुंबईच्या हायकोर्टात महाराष्ट्र शासनाचे महाअधिव्याख्याता यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देत आरोपीविरुद्ध कठोर कारवाई केली जावी अन्यथा पोलिसांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी न्यायालयाने आदेशित करावे अशी विनंती करत या घटनेच्या निषेधार्थ आज गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रातील वकिलांना न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार घालण्याची विनंती केली आहे. त्यामुळे आज महाराष्ट्रातील न्यायालयीन कामकाज ठप्प राहणार आहे.







बीड – जिल्हा न्यायालयाच्या पायऱ्यावर बसून बीड जिल्हा वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांसह वकिलांनी पोलिसांच्या विरोधात ठिय्या आंदोलन करत आरोपीविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करा अशी मागणी केली आहे. दुर्दैवाने सर्व आरोपींना अटक करा अशी मागणी करण्याची वेळ अकार्यक्षम पोलीस प्रशासनामुळे वकिलांवर आली आहे.

### पोलीस निरीक्षक प्रवीण बांगर यांची दादागिरी कशासाठी..?

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निरीक्षक प्रवीण बांगर यांना नोटरी वकील अँड राम डोंगरे यांच्यासह २०० पेक्षा अधिक वकील बांधव भगिनी वकील संघाचे अध्यक्ष पदाधिकारी यांनी घटनेचे वास्तव आणि गांभीर्य सांगून सुद्धा त्यांनी प्रत्यक्षात गुन्हा का दाखल करून घेतला नाही ? उलट वकिलांवरच दादागिरी केली, असा वकिलांचा आरोप होत आहे. पोलीस निरीक्षक यांना आरोपी काय करतो ? त्याचे धंदे काय ? तो कुठे असतो ? हे सगळे माहीत असताना सुद्धा त्याच्या विरोधात गुन्हा का दाखल केला नाही ? आरोपीला अभय देण्याचा का प्रयत्न केला गेला ? त्याचे उत्तर बांगर यांनी द्यावे असा सूर तमाम वकिलांनी घेतला आहे. त्याचबरोबर बांगर यांच्याविरुद्ध पोलीस अधीक्षकांनी रीतसर कारवाई करावी अशी मागणी देखील केले आहे.

### नोटरीचे अध्यक्ष अँड सिकंदर अली यांनी बीडमध्ये ठाण मांडले..!

महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अँड सिकंदर अली यांनी बीड जिल्हा न्यायालय येथे येऊन अँड.राम डोंगरे यांची भेट घेतली. परिस्थिती जाणून घेतल्यानंतर त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी विरुद्ध गुन्हा तात्काळ दाखल करावा आणि आरोपीला अभय न देता अटक करावी त्याचबरोबर आरोपी सोबत असलेल्या त्या सर्व आरोपींनाही अटक करावी तोपर्यंत मी बीडमधून जाणार नाही असा थेट इशारा पोलीस प्रशासनाला दिला आहे.

### आरोपीचे वकीलपत्र न घेण्याचा ठराव वकिलांनी घेतला..?

बीड जिल्हा न्यायालयातील वकिलांनी नोटरी वकील अँड राम डोंगरे यांना मारहाण करणाऱ्या आरोपींचे वकीलपत्र न घेण्याबाबत एक मुखाने ठराव घेतला आहे. इतक्या तीव्र भावना आता आरोपीच्या विरोधात उतरल्या आहेत.

## बीड तालुक्यात अवकाळीचा हाहाकार; फळबागांसह रब्बी पिकांचे अतोनात नुकसान

प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून मदत द्यावी; जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांची मागणी

बीड (प्रतिनिधी)

गेल्या दोन दिवसांपासून बीड तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. अचानक झालेल्या या निसर्गाच्या प्रकोपाने हातातोंडाशी आलेला घास हिरावला असून, शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या अनुषंगाने प्रशासनाने तातडीने नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

तालुक्यात झालेल्या या अवेळी पावसामुळे आणि बदलेल्या वातावरणामुळे रब्बी हंगामातील पिकांसह फळबागांना मोठा फटका बसला आहे. प्रामुख्याने रब्बी पिकांसह फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. रब्बी पिके: काढणीला आलेला गहू, परिपक्व झालेली ज्वारी आणि हरभरा ही पिके पावसामुळे आडवी झाली असून पिकांच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. फळबागा: बीड तालुक्यातील आंबा बागांचा मोहोर गळाला असून, उन्हाळी हंगामातील टरबूज आणि खरबूज यांसारख्या नगदी पिकांचे पाणी साचल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे.



शेतकऱ्यांच्या या दयनीय अवस्थेकडे लक्ष वेधताना गणेश वरेकर म्हणाले की, शेतकरी आधीच निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देत आहे. आता कुठे पीक काढणीला आले असताना या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर केला आहे. प्रशासनाने आता कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावेत. प्रशासनाने विलंब न लावता नुकसानीचा अहवाल शासनाकडे सादर करावा आणि बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत मिळवून द्यावी, जेणेकरून त्यांना या संकटातून सावरता येईल. कृषी आणि महसूल विभागाने संयुक्तपणे तात्काळ नुकसानीचे पंचनामे सुरू करावेत.नुकसानीचा टप्पा लक्षात घेऊन शेतकऱ्यांना हेक्टरी ठोस मदत जाहीर करावी. अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा ईशारा हि जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या वतीने देण्यात आला आहे.



## तुलशी शिक्षण समूहाने अल्पावधीत सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात लक्षवेधी ओळख निर्माण केली – वैभव स्वामी

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

तुलसी शिक्षण समूहाने सामाजिक बांधिलकी जोपासत गुणवत्तेची कास धरल्यामुळे अल्पावधीत आपली सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात लक्षवेधी ओळख निर्माण केली असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी व्यक्त केले.छत्रपती संभाजीनगर येथील तुलशी शिक्षण समूहाच्या मॉडर्न महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख व दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना वैभव स्वामी म्हणाले की, प्रा. प्रदीप रोडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तुलशी शिक्षण समूहाद्वारे सामाजिक बांधिलकी जोपासत

(उर्वरीत पान २ वर)

## शुक्लतीर्थ व वांगी देवस्थान साठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर

### अखेर डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्याला यश

दिंद्रुड (प्रतिनिधी)

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओम प्रकाश शेटे यांनी २०२३ पासून केलेल्या प्रामाणिक पाठपुराव्याला यश आले. आज मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत संत नारायण बाबा देवस्थान वांगी व श्री क्षेत्र शुक्लेश्वर देवस्थान मौजे शुक्लतीर्थ लिमगाव ता.माजलगाव येथील दोन्ही देवस्थानासाठी जवळपास तब्बल पाच कोटी रुपयांच्या आसपास निधी मंजूर करून प्रशासकीय मान्यता देण्यात आली. याबद्दल डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री व सरकारचे आभार मानले आहेत.



माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र शुक्लतीर्थ लिमगाव हे ऐतिहासिक व पुण्यपावन धाम म्हणून प्रसिद्ध आहे. हे देवस्थान तीर्थक्षेत्र ब मध्ये येण्यासाठी डॉ. शेटे यांचे मोलाचे योगदान आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. तसेच दशक्रिया विधी करण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांची संख्याही मोठी आहे. मात्र सोयी सुविधांचा अभाव असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास कामे अपेक्षित होती. त्यासाठी डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता, आज या पाठपुराव्याला यश आले आहे.

(उर्वरीत पान २ वर)

## भुवन वाळूघाटावर अवैध उत्खननाचे गंभीर आरोप

### १०–१५ फूट खोल खड्डे; धमक्यांचा आरोप – २७ फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाचा इशारा





तळणी (प्रतिनिधी)

मंठा तालुक्यातील भुवन (वझर सरकटे अंतर्गत) येथील गट क्रमांक १ मधील अधिकृत वाळूघाटावर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळू उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देत तात्काळ चौकशी व कारवाईची मागणी केली आहे.

सदर वाळूघाटाचा लिलाव 'आशा अंडरवॉटर सर्व्हिसेस प्रा. लि.' या कंपनीने घेतला असून, प्रोप्रायटर दिनेशकुमार रामेश्वरलाल बावन (रा. कल्याण बेस्ट, ठाणे, मुंबई) यांनी सर्वोच्च बोली लावून घाट ताब्यात घेतल्याचे सांगितले जाते. मात्र अधिकृत परवाना असला तरी नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

रात्री पोकलँडने उत्खनन?

ग्रामस्थांच्या निवेदनानुसार, संबंधित लिलावधारक रात्रीच्या वेळी पोकलँडच्या सहाय्याने नदीपात्रात मोठ्या प्रमाणात उत्खनन करीत आहेत. जीपीएस यंत्रणा बंद ठेवून किंवा नदीपात्रातच ठेवून नियम चुकवले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच एकदाच रॉयल्टी घेऊन त्याच पावतीवर दिवसभर तीन ते चार ट्रिप वाळू वाहतूक केली

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय....

# दहशतमोचक 'प्रहार'मंत्र

जगभरात निरनिराळ्या स्वरूपांतील दहशतवादाने थैमान घातले आहे. भारतही अनेक दशके या दहशतवादाचा बळी ठरतो आहे.

नवनव्या रूपांमध्ये समोर येणारा दहशतवाद रोखण्यासाठी सरकारने आणलेले नवे 'प्रहार' हे सर्वंकष धोरण म्हणजे या भीषण समस्येवरील भविष्यकालीन उपायांचा पाया म्हणता येईल. दहशतवाद्यांशी प्रत्यक्ष लढा देण्याबरोबरच त्यांना मिळणारी सर्व प्रकारची रसद रोखणे आणि यंत्रणा मजबूत करणे यावर या धोरणात भर आहेच; त्यापेक्षा दहशतवाद उभाच राहू नये, यासाठी त्याला खतपाणी घालणारी परिस्थिती बदलणे, हा सर्वांत मूलभूत-महत्त्वपूर्ण उपाय सरकारी धोरणांमध्ये या निमित्ताने समाविष्ट होत आहे. या धोरणात वर्तमान आणि भविष्यातील संभाव्य धोक्यांचाही विचार करून, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय समन्वयावर देण्यात आलेला भरही महत्त्वाचा आहे.

केंद्र आणि राज्यांच्या यंत्रणा आपापल्या परीने दहशतवादी कारवायांच्या विरोधात वेळोवेळी पावले उचलत असल्या, तरी या समस्येच्या मुळाशी जाऊन उपायोजना सुचवणारे एक व्यापक धोरण आवश्यक होतेच; त्याची सुरुवात या धोरणातून झाली आहे. आता केंद्र आणि राज्य सरकारांकडून त्याची कशी अंमलबजावणी होते, यावर देशाची दहशतवादातून मुक्तता अवलंबून आहे.

भारतातील दहशतवाद प्रामुख्याने पाकिस्तानपुरस्कृत आहे. थेट युद्धांमध्ये भारताकडून मार खाल्ल्यावर, आपण भारताला समोरासमोर युद्धात हरवू शकत नाही, याची जाणीव झाल्यानंतर या छुप्या कारवायांना पाकिस्तानमधून आशीर्वाद आणि रसद मिळू लागली. ईशान्येकडील राज्ये, पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावाद्यांकडून दहशतवादी कारवाया होत असत; मात्र मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटांनी हे संकट दारात येऊन ठेपल्याची सर्वांनाच तीव्रतेने जाणीव झाली. त्यानंतरही ठिकठिकाणी रेल्वे बॉम्बस्फोट , मुंबई हल्ला, संसदेवरील हल्ला, पुलवामा, गेल्या वर्षीचा पहलगाम हल्ला आणि नुकत्याच दिल्लीत झालेल्या भीषण स्फोटांपर्यंत दहशतवादी कारवायांची मोठी यादी आहे. या पार्श्वभूमीवर हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून, त्या पलीकडे आर्थिक-सामाजिक असा व्यापक विषय असल्याची जाणीव नव्या 'प्रहार' धोरणात प्रतिबिंबित झाल्याचे दिसते.

दहशतवादाला प्रतिबंध, प्रतिसाद, विविध यंत्रणांच्या क्षमतांचे एकत्रीकरण, मानवी हक्क आणि कायद्याच्या राज्याचे पालन हे मुद्दे धोरणाची व्यापकता दर्शवतात. बदलत्या परिस्थितीत दहशतवादाबाबत फक्त पाकिस्तानकेंद्रित विचार पुरेसा ठरणार नाही. अमेरिका-कॅनडापासून विविध देशांत अशा विषवल्ली फोफावताना दिसून येतात; त्यांना वेसण घालण्यासाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर सुसंगत प्रयत्न आवश्यकच आहेत. स्फोटकांबरोबरच रासायनिक-जैविक हल्ले, अणुहल्ले, किरणोत्सर्ग आणि डिजिटल हल्ले रोखण्यासाठीही उपाययोजनांवर या धोरणात भर आहे; तसेच सायबर हल्ले-हॅकिंग रोखण्यासाठी समाजमाध्यमे, डार्क वेब, क्रिप्टो वॉलेट आणि रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो, याचीही जाणीव ठेवण्याची गरज यामध्ये व्यक्त झाली आहे. प्रामुख्याने केंद्र आणि राज्यांच्या विविध यंत्रणांमध्ये समन्वय, वेळीच माहितीची देवाण-घेवाण आणि तातडीने कारवाईवर भर दिला आहे.

# आजचा निर्णयच ठरवेल उद्याचं भविष्य..!

पुणे (प्रतिनिधी)

शाळेतून महाविद्यालयाकडे प्रवास सुरु होतो. शाळा संपली की महाविद्यालयात प्रवेश मिळतो. हा टप्पा आयुष्याला नवी दिशा देणारा असतो. या वयात आई-वडिलांचे उपदेश ऐकायला जड जातात. काही मुलं अजूनही पालकांचा मान राखतात, त्यांचे बोलणे ऐकतात तर काहींना मित्रमैत्रिणींचं जगच सर्वकाही वाटू लागतं. महाविद्यालययात नवीन मित्र, नवी दुनिया सांगायला गेलो तर चार दिन की चांदणी सर्वकाही एक सुंदर स्वप्न.. महाविद्यालय म्हणजे नवीन ओळखी, नवी स्वप्नं आणि नवे अनुभव. काही मित्र योग्य मार्ग दाखवतात अभ्यास, मेहनत, प्रगती. तर काही चुकीच्या सवयी आणि वाईट संगतीकडे ढकलतात. मित्र महत्त्वाचे असतातच, पण त्याहून महत्त्वाचा असतो आपण निवडलेला मार्ग. काही मुलं चुकीच्या व वाईट संगतीमुळे अनेक तरुण व्यसनांकडे वळतात सिगारेट, गुटखा, तंबाखू... सुरुवातीला हे सगळं थाट वाटतं गॉगल, बाइक, ग्रुप, सुसाट गाडी घेऊन फिरणे मागे मुलीला बसवणे हिरोगीरी करने असे चालू असते पण खरा प्रश्न असा आहे ?

हा खरोखर मोठेपणा आहे का ?की स्वतःच्या आयुष्याला जखडणारी बेडी ? क्षणिक दिखाव्यासाठी घेतलेली ही सवय हळूहळू आयुष्याची दिशा बदलून टाकते. वेळेचा अपव्यय हे आपले होणारे सर्वात मोठं नुकसान कॉलेजच्या बाहेर घोळका करून उभं राहणं, मोबाईलवर तासन्तास वेळ वाया घालवणं... ही मजा काही क्षणांची असते. पण त्यामुळे जीवनाचं खरं ध्येय हरवतं. वेळ निघून गेल्यावर पश्चात्तापाशिवाय काहीच उरत नाही. म्हणूनच योग्य वेळी जागं होणं अत्यावश्यक आहे.

योग्य वयात मेहनत = उज्ज्वल भविष्य करिअर घडवायचं असेल, स्पर्धा परीक्षा द्यायची असेल, तर योग्य वयात मेहनत करणं अत्यंत गरजेचं आहे. हाच काळ आहे स्वप्नं साकार करण्याचा. हाच काळ आहे भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करण्याचा. जे तरुण आज लक्षपूर्वक अभ्यास करतात, तेच उद्या यशाच्या शिखरावर पोहोचतात. बोलतात ना आपला वर्तमान चांगला असेल तर आपल भविष्य चांगल असत त्यासाठी मेहनत करने अति आवश्यक आहे तंत्रज्ञानाचा योग्य वापर मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया ही साधनं आहेत आपले काम सोयीस्कर होण्यासाठी वेळ वाया घालवण्यासाठी नव्हे, तर अभ्यास, ज्ञान आणि करिअर घडवण्यासाठी. जो तरुण या साधनांचा योग्य वापर करतो, त्याच्यासाठी यशाची अनेक नवी दारं खुली होतात. भारताचं भविष्य आजच्या तरुण पिढीच्या हातात आहे.

भारताचं खरं भविष्य युवा पिढीत आहे.जर युवकांनी शिस्त स्वीकारली, प्रामाणिकपणा जपला, व्यसनांपासून दूर राहण्याचा निर्धार केला, करिअर आणि समाजासाठी कार्य केलं तर उद्याचा भारत नक्कीच सुवर्णमय होईल.स्वामी विवेकानंदाच एक वाक्य खूप काही सांगून जाते.उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.प्रिय युवकांनो... तुमचं भविष्य तुमच्या हातात आहे. तात्पुरत्या मजेत हरवणार, की मेहनतीने आयुष्य घडवणार ? निर्णय तुमचाच आहे... आणि त्या निर्णयावरच भारताचं उद्याचं यश ठरणार आहे!शेवटी एकच पण खूप महत्वाचे व्यसनं आपलं आयुष्य अंधारात नेत, पण शिक्षण, मेहनत आणि प्रामाणिकपणा यशाच्या शिखरावर नेतात. आजचा निर्णयच ठरवेल उद्याचं भविष्य !

लेखिका,
**प्रा. दिपाली नारायण बागनाईक,**
पुणे, डॉ. डी. वाय. पाटील आर्टस, कॉमर्स, अँड सायन्स महाविद्यालय
पिंपरी पुणे-१८

# कठोर परिश्रमानंतर यश मिळतेच याचे जिवंत उदाहरण म्हणजे गेवराईचे मनोहर किसनराव पिसाळ

## चौथी नापास असुन ही गेवराईचे यशस्वी फिनिक्स भरारी घेणारे उद्योजक

**गेवराई (प्रतिनिधी)**

**गेवराईत नुसते कापूस व्यापारी म्हणलं तरीही सर्वत्र सुप्रसिद्ध असणारे मनोहर भाऊ पिसाळ यांचा चेहरा सर्वांच्या डोळ्यासमोर येतो. ४ थी नापास असूनही एक यशस्वी उद्योजक म्हणून मनोहर भाऊ यांच्याकडे पाहिले जाते. अतिशय शांत व मनमिळाऊ स्वभाव उंची जरी कमी असली तरी कीर्ती सात समुद्रा पल्याड. शेतकऱ्यांसाठी मनोहर भाऊ चे कार्य व सहकार्य वरदान ठरत असून गेवराई शहराच्या वैभवात त्यांच्यामुळे भर पडलेली आहे. यामुळेच मनोर भाऊ पिसाळ यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या राज्यव्यापी मेळाव्यामध्ये राज्यस्तरीय महाराष्ट्र राजरत्न यशस्वी उद्योजक पुरस्कार २०२० हा सन्मानाचा देऊन गौरव करण्यात येणार आहे.**

मनोहर पिसाळ यांच्या प्रयत्नामुळे मोठमोठ्या जिनिंग गेवराई शहरात सुरू झालेल्या आहेत तर, शेतकरी नगदी पीक म्हणून ज्या पिकाकडे पाहतो त्या कापसाच्या पिकाची मोठी बाजारपेठ गेवराई तालुक्यात उभी होण्यासाठी मनोहर भाऊ पिसाळ यांचे मोठे योगदान आहे.मनोहर भाऊ पिसाळ यांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यांचे आई



वडील वडलोपारजीत शेती करत होते. त्यातूनच त्यांचा प्रपंच चालायचा घरात पैसा नसल्याने मनोहर भाऊ शिक्षण येऊ शकले नाही. मनोहर भाऊ यांना बाबा, प्रभाकर, सुधाकर व मधुकर असे चार भाऊ होते व मनोहर भाऊ हे सर्वात मोठे होते त्यामुळे ४ थी नापास होता त्यांनी शाळा सोडली व आपल्या घरच्या शेतात वडिलांना शेतीकामात मदत करू लागले त्यानंतर त्यांनी बाल वयातच डोक्यावर हंडा घेऊन बाजारात पाणी विकले, बांधावरील गवत काढून विकले नंतर पान टपरी टाकली पान टपरी चालवत असताना भुसार मालाचा व्यापार गेवराई, उमापूर, तलवाडा, मादळमोही व चकलांबा येथील बाजारपेठेत

## उद्योजक मनोहर पिसाळ यांना पत्रकार संघाचा महाराष्ट्र राजरत्न पुरस्कार जाहीर..!

केला. पुढे ते शेतकऱ्यांचा कापूस विकत घेऊ लागले बघता बघता कापसाची आवक वाढत गेली व मनोहर भाऊ स्वतः कापसाचे व्यापारी झाले. आपल्याकडे आलेला कापूस इतर जिनिंगला घालू लागले. पुढे त्यांनी शेंधवा या ठिकाणी कापूस घालण्यास सुरुवात केली. शेंधवा येथील जिनिंग मालकांशी चांगली ओळख झाली त्यातुन मनोहर भाऊ यांनी शेंधवा येथील काही व्यापाऱ्यांशी चर्चा केली त्यांना गेवराई जिनिंग टाकण्याची विनंती केली व गेवराई तालुक्यात २००१-२००२ ला अनेक कापूस जिनिंग चालू करण्यासाठी त्यानां जागा घेऊन एनओसी मिळवून देण्यास मदत केली. मनुष्यबल व पाठबळ देत त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहिल्याने गेवराई तालुक्यात भरपूर जिनिंग झाल्या शेवटी मनोहर भाऊ पिसाळ यांनी २००९ - २०१० बीड जालना हायवे कॅप्टन पंपा शेजारी महाबली कॉटन इंडस्ट्रीज नावाने जिनिंग चालू केली व अनेक बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले तसेच शेतकरी ही नगदी पीक म्हणून कापसाकडे पाहू लागले त्यामुळे गेवराई कापसाची मराठवाड्यातली सर्वात मोठी बाजारपेठ झाली. शेतकऱ्यांना कापसाच्या बियाण्यापासून तर कापूस काढेपर्यंत मदतीचा हात देत असल्याने शेतकरी ही मनोहर भाऊ यांनाच आपला कापूस घालतात. अतिशय शांत व मनमिळाऊ स्वभावामुळे मनोहर भाऊ पिसाळ हे सर्वत्र परिचित असून माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे ते निकट वरती आहेत. शेतकऱ्यांच्या सुख दुःखाची जाण असल्याने अमरसिंह पंडित यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीत संचालक म्हणून काम करण्याची मनोहर भाऊ यांना संधी दिली असता मनोर भाऊ यांनीही संधीचे सोने केले. फक्त जिद्द व मेहनत तसेच चिकाटीने केलेला मनोहर भाऊ पिसाळ यांचा व्यावसाय हा तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# शिराढोणमध्ये घरकुल स्वप्नांना गती; ७२ लाभार्थ्यांसाठी जागेची पाहणी

शिराढोण । प्रतिनिधी: बिलाल कुरेशी

शिराढोण येथील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या घरकुल लाभार्थ्यांना स्वतःची मालकीची जागा उपलब्ध नसल्यामुळे घरकुलापासून वंचित राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल अर्थसहाय्य योजना अंतर्गत ७२ पात्र लाभार्थ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या जागेची प्रत्यक्ष पाहणी आज करण्यात आली.

यासाठी जिल्हा परिषद धाराशिव चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मनीष घोष यांनी शिराढोण येथे भेट देत संबंधित जागेची सखोल तपासणी केली. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सदर जागा लवकरात लवकर लाभार्थ्यांच्या नावे करून घरकुल बांधकाम प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

या आश्वासनामुळे ७२ कुटुंबांच्या घराच्या स्वप्नांना आता प्रत्यक्ष आकार मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. अनेक वर्षे स्वतःच्या घराची प्रतीक्षा करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी ही भेट दिलासा देणारी ठरली. मान्यवरांची उपस्थिती या पाहणीवेळी पंचायत समिती कळंबचे गटविकास अधिकारी श्री. सोपान अकेले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मेघराज पवार, कळंबचे विस्तार अधिकारी श्री. हनुमंत झांबरे, विस्तार अधिकारी साळुंखे साहेब, ग्रामसेवक श्री. मोतीराम करपे, उपसरपंच अमोल माकोडे, माजी सरपंच पद्माकर पाटील, किरण पाटील, ग्रामपंचायत लिपिक राहुल यादव, शेतकरी सुमंत नाईकवाडे तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

गावकऱ्यांमध्ये समाधान

जिल्हा परिषद प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे शिराढोण गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरकुलासाठी जागेचा अडचण दूर होत असल्याने आता लवकरच बांधकामाला सुरुवात होईल, अशी अपेक्षा लाभार्थ्यांनी व्यक्त केली आहे. शिराढोणमध्ये विकासकामांना मिळालेली ही गती ग्रामीण भागातील घरकुल योजनांना नवी दिशा देणारी ठरत आहे.

पान १ वरुन...

**तुलशी शिक्षण समूहाने ....**

उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्तेच्या बळावर आपली स्वतंत्र उल्लेखनीय अशी ओळख निर्माण केली आहे. फॅशन डिझाईन सारख्या नव्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडवावे यासाठी त्यांनी उभारलेली साधनसामग्री लक्षात घेता भविष्यात तुलशी फॅशन डिझाईनचा नवा ब्रँड उदयास येईल. असा विश्वास व्यक्त करून विद्यार्थ्यांनी फॅशन डिझाईन क्षेत्रास आपल्या कल्पकतेची जोड देऊन आपले स्थान निर्माण करावे अशा शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी वैभव स्वामी यांचा महाविद्यालयाच्या वतीने हृदयपूर्वक सत्कार प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र भगत यांनी केले. यावेळी प्रा. हर्षद वाघमारे प्रा डॉ प्रज्ञा किवंडे प्रा. नबिया खान प्रा. तुबा सय्यद प्रा. उत्कर्षा वाघमारे प्रा. ज्योती मोरे, पवन मस्के यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी प्रा हर्षद वाघमारे यांनी आभार मानले.

**शुक्लतीर्थ व वांगी ....**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत २ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये प्रसादालय, सभामंडप, भक्त निवास , महिला व पुरुषांसाठी शौचालय आदी विकास कामे केली जाणार आहेत. संस्थानचे अध्यक्ष गुरुवर्य हभप तुकाराम महाराज शास्त्री डॉ. शेती व सरकारचे आभार मानले आहेत.

वैकुंठवासी संत नारायण बाबा देवस्थान वांगी या तीर्थक्षेत्रालाही डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या प्रयत्नाने तीर्थक्षेत्र ब चा दर्जा मिळाला होता. पंचक्रोशीतील जवळपास ६० गावांमध्ये या देवस्थानचा भक्त व शिष्य परिवार आहे. जागृत देवस्थान असलेल्या या देवस्थानला वर्षभरात लाखोंच्या संख्येने भाविक भक्त दर्शनासाठी येतात. या ठिकाणी हे मोठ्या प्रमाणात विकास कामे अपेक्षित आहे. त्यासाठी येथे मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती. डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे पाठपुरावा करून २ कोटी ०३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. यामध्ये सांस्कृतिक सभागृह, भोजन कक्ष, महिला व पुरुषांसाठी शौचालय, संरक्षक भिंत, पेवर ब्लॉक आदी विकास कामे केली जाणार आहेत.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील दोन्ही देवस्थानच्या विकासाकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व सरकारने दिलेली ही मदत अनमोल आहे. खऱ्या अर्थाने, अशी देवस्थाने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाद्वारे जिल्ह्यातील सामाजिक स्वास्थ्य अबाधित राखण्यासोबतच जातीयतेची दरी कमी करण्यात मदत करतात. या धार्मिक संस्थानांचा विकास करणे सर्वांची जबाबदारी आहे.

पान १ वरुन...

- डॉ. ओमप्रकाश शेटे

**भुवन वाळूघाटावर ....**

जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

१० ते १५ फूट खोल खड्डे; जीवितास धोका

सदर ठिकाणी १० ते १५ फूट खोल खड्डे पडले असून त्यामुळे जनावरांसह नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. क्षमतेपेक्षा जास्त वाळू उपसा व वाहतूक होत असल्याचे सांगण्यात आले. भुवन येथील वाळूघाट मंठा तालुक्यात असला तरी बुलढाणा जिल्ह्यातही अवैध वाहतूक सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. काही वाहनांना क्रमांक नसल्याचेही निदर्शनास आणले आहे.

धमक्यांचा आरोप; संरक्षणाची मागणी

अवैध उत्खननाविरोधात आवाज उठवणाऱ्या ग्रामस्थांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी जालना पोलिस अधीक्षक कार्यालयातही प्रतिलिपी देत संरक्षणाची मागणी केली आहे.

एटीएस मशीनद्वारे मोजणीची मागणी

वाळूघाटाची तात्काळ एटीएस मशीनद्वारे मोजणी करून वस्तुस्थिती समोर आणावी, तसेच ड्रोन सर्वेक्षण करून दोषींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.अधिकृत परवाना आहे म्हणून नदीचे पात्र पोखरण्याचा अधिकार कोणालाही नाही. १० ते १५ फुटांचे खड्डे खणले जात असतील तर ही प्रशासनाची मोठी हलगर्जी आहे. तातडीने पाहणी करून कारवाई व्हावी, असे ग्रामस्थ धम्मपाल कहाळे यांनी सांगितले.

२७ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण

तीन दिवसांत चौकशी व कारवाई झाली नाही तर दि. २७ फेब्रुवारी २०२६ पासून सर्व ग्रामस्थ वाळूघाटावरच आमरण उपोषणास बसतील. आमच्या जीवितास काही हानी झाल्यास संबंधित लिलावधारक व प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

दरम्यान, या संदर्भात तहसीलदार सुमन मोरे यांनी तक्रारीत तथ्य असल्यास कारवाई करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया दिली. मात्र या प्रतिक्रियेमुळे महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तथ्य शोधत बसण्याऐवजी तत्काळ पाहणी व ठोस कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.आता प्रशासन प्रत्यक्ष कारवाई करते की केवळ आश्वासनांवरच प्रकरण थांबते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गोदावरी पात्रात नियमांची पायमल्ली

## माजलगाव आणि परळीत वाळूचा अवैध उपसा जोमात

बीड: जिल्हयातील माजलगाव आणि परळी तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या पात्रातून सध्या महसूल आणि पर्यावरण विभागाच्या सर्व अटी-शर्ती धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पत्रकार लक्ष्मण उजगरे यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडे पुराव्यासह तक्रार करत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मशिन्सचा वापर अन् नियमांचे उल्लंघन

मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील आडोळा, गंगामसला आणि परळी तालुक्यातील तेलसमुख येथे अधिकृत वाळू धक्क्यांच्या नावाखाली हा काळा बाजार सुरू आहे. वास्तविक, वाळू उपसा करताना मशिन्सचा वापर करण्यास मनाई असतानाही, या ठिकाणी 'टू-टेन' (२१०), जेसीबी आणि क्रेन यांसारख्या अत्याधुनिक मशिन्सचा वापर करून दिवस-रात्र नदीचे पात्र ओरबडले जात आहे. यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून नदीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे.

कोऱ्या पावतीचा 'नवा' गोरखधंदा

या अवैध उपशात वाहतुकीसाठी देखील अनोखी शक्कल लढवली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा आणि टीप्पर चालकांना एकच इन्व्हॉइस (खर्पींळलश) जनरेट करून दिले जाते. धक्कादायक बाब म्हणजे, चालकांकडे एक कोरी पावती दिली जाते, ज्यावर ना तारीख असते, ना वेळ, ना ठिकाण. जर वाटेत कुठे तपासणी झाली, तर त्याच वेळी त्यावर माहिती भरून प्रशासनाची दिशाभूल केली जाते. या प्रकारामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी

या सर्व प्रकाराची गांभीर्याने दखल घेत पत्रकार लक्ष्मण उजगरे यांनी २५ फेब्रुवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी गोदावरी पात्रातील या अवैध उपशाचे पुरावे सादर केले असून, संबंधित वाळू घाटांवर तात्काळ धाडी टाकून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता प्रशासन या 'वाळू माफियांच्या' मुसक्या आवळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# पिंपळगाव माथा येथील आगीत बाधित आदिवासी कुटुंबाला मायेचा आधार; महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सहकार्य!

## मेंगाळ कुटुंबाच्या दुःखात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा सहभाग; जीवनावश्यक साहित्याची मदत!



महाशिवरात्रीला लागलेल्या आगीत सर्वस्व गमावले; पत्रकार संघाकडून तातडीची मदत!

संगमनेर खुर्द (ता. संगमनेर): प्रतिनिधी, संजय गोपाळे

संगमनेर तालुक्यातील पिंपळगाव माथा येथील भरमखास वाडीत राहणाऱ्या आदिवासी कुटुंबातील सावळेराम रामभाऊ मेंगाळ यांच्या घराला महाशिवरात्रीच्या दिवशी दुपारच्या सुमारास अचानक आग लागून संपूर्ण संसार जळून खाक झाला. या दुर्घटनेत घरातील अन्नधान्य, कपडे, भांडीकुंडी व अन्य जीवनावश्यक साहित्य जळून नष्ट झाले. त्यामुळे मेंगाळ कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, संगमनेर शाखेच्या वतीने तातडीने मदतीचा हात पुढे करण्यात आला. कुटुंबाला गृहउपयोगी वस्तू, कपडे व इतर आवश्यक साहित्य देऊन मायेचा आधार देण्यात आला. या मदतवाटप कार्यक्रमामुळे मेंगाळ कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, संगमनेर तालुका अध्यक्ष संजय गोपाळे, समन्वयक संजय फुलसुंदर, पिंपळगाव देपा येथील पोलीस पाटील भांगरे तसेच पत्रकार संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते मेंगाळ कुटुंबाला संसारोपयोगी साहित्य सुपूर्द करण्यात आले.

प्रसंगी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा राज्यातील पत्रकार, शालेय विद्यार्थी तसेच दीनदुबळ्या घटकांसाठी वर्षातील बहुतांश दिवस विविध सामाजिक उपक्रम राबवत असतो. कोणाच्या सुखात जरी सहभागी होता आले नाही तरी दुःखाच्या प्रसंगी संघ नेहमीच मदतीसाठी धावून जातो, असे ते म्हणाले. संघाचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून आंध्र प्रदेश, केरळ, गुजरात, मध्य प्रदेश व गोवा या राज्यांतही संघाची सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच पिंपळगाव देपा येथील मेंगाळ कुटुंबाला कायमस्वरूपी घर उभारण्यासाठी संगमनेर व अकोला मतदारसंघातील आमदारांनी विशेष मदत करावी, असे आवाहनही डॉ. आरोटे यांनी यावेळी केले.या उपक्रमासाठी संगमनेर शहरातील प्रसिद्ध डॉ. कुटे, अभियंता सानप, राजन दादा युवा मंच, अभियंता रजनीकांत कवडे, अभियंता सोमनाथ गोडसे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. स्थानिक ग्रामस्थांनीही पुढाकार घेत कुटुंबाला मानसिक आधार दिला.या सामाजिक कार्यामुळे पत्रकार संघाने समाजातील वंचित घटकांप्रती आपली संवेदनशीलता आणि बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# रासेयो शिबीरात सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन

मुक्रमाबाद (प्रतिनिधी)

मौजे गोणेगाव ता.मुखेड येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळाला. दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय शिबिराचा आजचा चौथा दिवस, आज सकाळी साडेआठ वाजता मौजे गोणेगाव येथे सर्व रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आलेले होते. सदर शिबिरामध्ये मुक्रामाबाद येथील प्रसिद्ध डॉक्टर सुधाकर रेड्डी व डॉक्टर अक्षय इंद्राळे (दंतरोग तज्ज्ञ )यांनी १११ रुग्णांची तपासणी केली. यावेळी गावातील नागरिकांचा अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला .तज्ञ डॉक्टरांनी मोफत सेवा देण्याचे योगदान आजच्या शिबिरामध्ये केले. यावेळी महाविद्यालयातील स्वयंसेवक व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.मा.म. गायकवाड, सहकार्यक्रम अधिकारी डॉ.आर.बी.मादळे, डॉ.एस.एल.सकनुरे, डॉ.आर.बी. बाविस्कर उपस्थित होते.

तसेच याच दिवशी दुपारच्या उद्बोधन सत्रात डॉ.एन.एच.पांचाळ, डॉ.व्ही बी.पवार, डॉ.बी.एम. मुस्कवाड, प्रा.एस.बी.गवते यांचे 'मूल्य संवर्धन' विषयावरील, 'पर्यावरण आपत्ती व्यवस्थापनची,'वाचन संस्कृती', 'वृक्ष लागवड', याबद्दलचे भाषणे झाली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्राचे प्रास्ताविक डॉ आर.बी.मादळे यांनी केले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थीनी कुमारी मनीषा सूर्यवंशी हिने केले शेवटी आभार सुरज भिंगोले यांनी मानले.

# उंद्री (प.दे.) येथे छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी

मुखेड (प्रतिनिधी)

मुखेड तालुक्यातील उंद्री (प.दे.) येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.जयंतीनिमित्त पहिल्या सत्रात महाराजांच्या नियोजित स्थळी फलक व प्रतिमेचे पूजन करून महामानवांच्या पुष्पहार अर्पण करण्यात आले.त्यानंतर आदरणीय माधवराव पाटील वडजे उंद्रीकर यांच्या हस्ते शिवध्वजारोहण करण्यात आले.उपस्थित मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दुपारी भव्य शिवमिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.सजवलेल्या तैलचित्रासह मिरवणूक शिस्तबद्ध व शांततेत पार पडली. छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. कार्यक्रमास माधवराव पाटील उंद्रीकर,सरपंच प्रतिनिधी सुधाकर गुरुजी गन्लेवार, पोलीस पाटील प्रतिनिधी विजय वादे, अच्युत पाटील, गोपाळ बिरादार, बालाजी भोकरे, पप्पू पाटील मटके, राजू पाटील सुर्यवंशी, बाळासाहेब पाटील कदम, माधवराव पाटील गोणारे, ज्ञानेश्वर पाटील वडजे,पत्रकार बालाजी शिंदे,शिवाजी पाटील वडजे, श्रीराम पाटील वडजे, प्रकाश पाटील सुर्यवंशी, हिरामण सोनकांबळे, दयानंद सोनकांबळे, लक्ष्मण राठोड, आकाश शिरगिरे, ओमकार सुर्यवंशी, तिरुपती सुर्यवंशी, गोविंद कौडगावे, ज्ञानेश्वर उंद्रै, पवन पवार, कन्हैया बिरादार, अभिजीत बिरादार, माधव पवार यांच्यासह असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान पोलीस बंदोबस्तासाठी बिट जमादार गिते व पोलीस कॉन्स्टेबल हुसाळे उपस्थित होते. तसेच मिरवणुकीदरम्यान मुखेडचे पी.आय. लक्ष्मण केंद्रे यांनी भेट देऊन पाहणी केली.कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# बाऱ्हाळीत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळा संपन्न

मुक्रमाबाद (प्रतिनिधी)

बाऱ्हाळी येथे जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या पादुका भव्य मिरवणूक, पादुका दर्शन सोहळा , उपासक दिक्षा ,पुष्पवृष्टी ,गुरूपूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

बाऱ्हाळी ता. मुखेड येथे मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिध्द पादुकांची मुख्य रस्त्यावरून विविध देखावे, टाळ मृदंगाच्या घोषात भव्य मिरवणूक काढण्यात आली. भक्तांना भव्य मिरवणूक आणि गुरुपूजन पालखी सोहळा, अध्यात्म, भक्ती आणि परंपरेचा सुंदर संगम अनुभवयास मिळाला. यावेळी दुर्बल घटक उपक्रमाअंतर्गत गरीब व गरजू कुटुंबाना घरघंटी पिठाची गिरणीचे वाटप प्रमुख अतिथी गंगाधर राठोड, (नगरसेवक तथा मा.नगराध्यक्ष मूखेड ),राजन देशपांडे (सरपंच प्र.), काकासाहेब वनारसे (पिठ प्रमूख ,उपपिठ तेलंगणा), शेषराव चव्हाण (नेते राष्ट्रवादी काँग्रेस), डॉ. श्रावण रँपनवाड (प्रदेश सचिव काँग्रेस ), मल्हारराव देशपांडे, श्रीमती विजयाताई देशपांडे,खूशालराव पा.उमरदरीकर ,शेखर देशमुख, बालाजी पा.सकनूरकर, साहेबराव देशमुख ,यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले. नाणीजधाम येथील ज.न.म.प्रवचनकार विपिन नेवासकर यांचे सूंदर अम्रतमय प्रवचन झाले तर भक्तांनी जय सियाराम, जगद्गुरु




रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी की जय च्या जयघोषांनी अख्खा परिसर दुमदुमून टाकला.सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र यावेळी दिसून आले. पादुका दर्शन सोहळ्यास उदगीर, जळकोट, मुखेड, देगलूर, बिलोली आधी परिसरातील जवळपास तीस हजार भाविक उपस्थित होते. पारंपरिक ढोल-ताशे, टाळ-मृदंग, भजन-कीर्तन, व लझीम च्या तालात पादुकांची(रथ) मिरवणूक काढण्यात आले.या सोहळ्यात महिला, बालके, युवक, ग्रामस्थ आणि विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला.

कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनातर्फे तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. हा सोहळा पूर्णत्वास नेण्याकरिता म्हणून आयोजक समितीने अथक परिश्रम घेत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात उत्कृष्ट नियोजन करून हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न केला. श्रद्धा, संस्कृती आणि अध्यात्मिक वारसाचे जतन करणारा सोहळा ठरल्याची भावना उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा सेवा समिती नांदेड (दक्षिण ),तालुका सेवा समिती, उत्सव समिती व कार्य समिती बाऱ्हाळी यांनी परिश्रम घेतले.

## जाहिर प्रगटन

**श्री.नवनाथ फत्तु कुंचे रा.पैठण ता.पैठण**

**विषय :- जन्म/ मृत्यू सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये अर्ज**

ज्यानुसार जाहीर पर्यटन द्वारे श्री नवनाथ फत्तु कुचे. राहणार पैठण तालुका पैठण यांनी विनंती अर्ज सादर करून कळविले आहे की यांची मुलगी श्रावणी यांचा जन्म पैठण येथील संदर्भ क्रमांक ०३) अन्वये रुग्णालयामध्ये दिनांक १५/१०/२०२५ रोजी झाला आहे त्याबाबतचे संबंधिताचे प्रमाणपत्र जारी करण्याबाबतचे आदेश मिळण्यास विनंती केली आहे करीता सदर प्रकरणी जर कोणाचा काही उजर/आक्षेप /हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उजर/आक्षेप/ हरकत/ मूळ कागदपत्रासह या न्यायालयात नोंदवावा मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर/आक्षेप/ हरकत ग्राह्य धरले जाणार नाहीत व अर्जदाराचे जन्म प्रमाण पत्राबाबत आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी सदर जाहीर प्रगटन माझ्या सहि व शिक्कानिशी देण्यात आले

**दि:-५/२/२०२६.** **स्थळ: पैठण**

## जाहिर प्रगटन

**दिनांक २५/०२/२०२६**

तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, मौजे टाकळी ता. केज जि. बीड येथील जमीन सर्वे नं. / गट नं. ६२ एकूण क्षेत्र ०० हे. ०४ आर, पो. ख. ०० आर पैकी विक्री केलेले क्षेत्र ०० हे ०४ आर ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

तुकडा नं. १ ची चतुःसिमा पुर्व- सुभाष रावसाहेब कदम, पश्चिम - मोहरबाई बबन कदम, दक्षिण -केज बीड रस्ता, उत्तर - शिवाजी साहेबराव कदम तुकडा नं. २ ची चतुः सिमा पुर्वेस - मोहरवाई बबन कदम, पश्चिमेस - रूपाली रविंद्र घुले व विष्णु वसंतराव घुले, दक्षिणेस - केज बीड रस्ता, उत्तरेस -शिवाजी साहेबराव कदम या प्रमाणे वर्णनाची मिळकत त्या मधील अनुवंशीक अधिकारासह कायम खरेदी घेण्याचा करार माझे अशिल मकरंद माणिकराव बारगजे, रा. टाकळी ता. केज जि. बीड यांनी या मिळकतीचे मालक व ताबेदार राजाराम रावसाहेब कदम रा. टाकळी ता. केज जि. बीड यांचेशी केलेला आहे आणि व्यवहार पूर्ण करण्याचे कामी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण न झाल्यास माझे अशिल सदरची मिळकत कायमस्वरूपी खरेदी करणार आहेत. सदरच्या मिळकतीचा विनाबोजा, विनातारण अथवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही व सदरील मिळकतीचा वाद नसल्याची खात्री विद्यमान मिळकत मालकांनी दिलेली आहे.

तरी वरील मिळकती बाबत कोणालाही खरेदी, गहाण, बक्षीस, मृत्यूपत्र, अदला बदल व इतर त्या प्रकारच्या आर्थिक स्वरूपाचा बोजा, वहिवाटी, कोर्ट डिक्री, आधारे इत्यादी कोणत्याही प्रकारचे (स्थावर मिळकती संबंधी) कोणतेही हक्क अथवा अधिकार असल्यास त्यांची लेखी नोंद खरेदी घेणाराकडे अथवा त्यांचे विधीज्ञांकडे संबंधीत कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन सात दिवसाचे आत करावी. नसता त्या नंतर वरील मिळकती बद्यल कोणालाही कोणत्याही प्रकारचे (सुप्त देखील) अधिकार नाहीत आणि माझ्या आशिलाच्या खरेदी व्यवहार करण्यास आक्षेप नाही, असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्या नंतर कोणाचाही अधिकार असणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

**ठिकाण -केज**
**दिनांक २५/०२/२०२६**
**मार्फत -**
**ॲड. ए. एल. लाड, केज**

**जाहिर प्रगटन देणार**
**स्वाक्षरित/-**
**मकरंद माणिकराव बारगजे**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६४ दि.२५.०२.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रिजवान अहमद इकबाल अहमद शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रिजवान अहमद इकबाल अहमद शेख | स्वतः | २१.११.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-०२ दि.२५.०२.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **इसराईल इस्माईल शेख रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **बहिण**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तय्यबा ईस्माईल शेख | बहिण | ०४.०९.१९९४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १३३/२०२६**
**सुभिद्राबाई - विरूध्द - निरंक**
**(मार्फत ॲड वाय. एच. पाटील )**

ज्याअर्थी मयत नामे अंकुश नाथा घोडके हे/ या दिनांक १३.०६.२०२५ रोजी मौजे धुमेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार
१) सुभिद्राबाई भ्र. अंकुश घोडके वय ८० वर्षे धंदा-घरकाम रा धुमेगाव ता. गेवराई जि. बीड.
२) हरिचंद्र पि. अंकुश घोडके वय ५० वर्षे धंदा-शेती रा धुमेगाव ता. गेवराई जि. बीड.
३) ताराचंद पि. अंकुश घोडके वय ४७ वर्षे धंदा-शेती रा धुमेगाव ता. गेवराई जि. बीड.

यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे अंकुश नाथा घोडके धुमेगाव ता. गेवराई जि. बीड जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०४.०४.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११६७ दि.२४.०२.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री भागवत प्रल्हाद परमेश्वर रा.शहापुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भागवत प्रल्हाद परमेश्वर | स्वतः | १९.१०.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५३ दि.१७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमती शबाना साहेब खान पठाण रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शबाना साहेबखान पठाण | स्वतः | ०१.०७.१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५२ दि.१७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अरबाज शकिल सय्यद, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अरबाज शकिल सय्यद | स्वतः | ०५.०६.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# वसुधैव कुटुंबकम संकल्पनेतून परळीत राष्ट्रसंत गाडगेबाबांचा विचारांचा जागर

## परिवर्तनासाठी संत, सुधारक आणि समाजक्रांतिकारक या तिन्ही भूमिकांचे गाडगेबाबा मूर्तिमंत प्रतीक - ज्येष्ठ विचारवंत श्रीपाल सबनीस








परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

वसुधैव कुटुंबकम म्हणजेच संपूर्ण जग हेच एक कुटुंब आहे, हा उदात्त विचार कृतीतून मांडणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त परळी येथे विचारांचा जागर करण्यात आला. समाजप्रबोधन, स्वच्छता आणि समतेचा संदेश देणाऱ्या बाबांच्या सुवर्ण शतकोत्तर महोत्सवी वर्ष सोहळ्याने परळीकरांना परिवर्तनाची नवी दिशा दिली.

संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परळी यांच्या वतीने दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य श्रीपाल सबनीस होते. समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांच्या हस्ते सोहळ्याचे उद्घाटन झाले, तर प्रमुख पाहुणे म्हणून ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे उपस्थित होते.

**गाडगेबाबा म्हणजे परिवर्तनाची मशाल: श्रीपाल सबनीस**

अध्यक्षीय भाषणात डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, परिवर्तनासाठी संत, सुधारक आणि समाजक्रांतिकारक या तिन्ही भूमिका गाडगेबाबांनी आपल्या आयुष्यातून साकारल्या. विचार कधीही मरत नाहीत; ते काळाच्या ओघात अधिक बळकट होतात. गाडगेबाबांनी मंदिरे न बांधता शाळा आणि धर्मशाळा उभारल्या. हातात झाडू आणि डोक्यावर गाडगे घेऊन समाजपरिवर्तनाची मशाल पेटवणारा असा महापुरुष जगात दुर्मिळ आहे.

**झोपडपट्टीतून उभा राहिलेला प्रवास हीच विचारांची ताकद: विशाल लोंढे**

उद्घाटक विशाल लोंढे, समाज कल्याण सहायक आयुक्त, पुणे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, झोपडपट्टीत जन्मलेला एक मुलगा महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रशासकीय सेवेत उभा राहू शकतो, हाच संतांच्या विचारांचा विजय आहे. प्रशासनात काम करताना समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणे हीच गाडगेबाबांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**संविधानातील मूल्ये रुजविणे हेच संतांचे कार्य: ज्ञानेश्वर महाराज वाबळे**

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांनी आपल्या प्रबोधनपर कीर्तनातून संविधानातील मूल्यांची मांडणी केली. ते म्हणाले, लोकशाही, समता, बंधुता आणि न्याय ही संविधानातील मूल्ये रुजविणे हेच संतांचे कार्य होते. जोपर्यंत समताधिष्ठित समाज निर्माण होत नाही, तोपर्यंत कष्टकरी सुखी होणार नाही.

वसुधा लिंबाजी ठोके ,नर्सिंग ऑफिसर्स यांनी सत्कार स्वीकारताना समाजाने परिचारिकांचा सन्मान करणे अधिक गरजेचे आहे असे सांगितले.

### नियोजनबद्ध सोहळा

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक पृथ्वी शिंदे यांनी केले. त्यांनी गाडगेबाबांच्या विचारांची मशाल पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक लक्ष्मण वैराळ यांनी केले.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संयोजक पृथ्वी शिंदे, निमंत्रक सुशील पोटभरे, रोहित झिंजुर्डे, विकास वाघमारे, राहुल सूर्यवंशी, विशाल डोंबे, महेश मुंडे आदींनी परिश्रम घेतले, अशी माहिती अनिल जायभाये बीडकर यांनी दिली. या कार्यक्रमाला परळीतील नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# नागनाथ विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश



बीड (प्रतिनिधी)

तालुक्यातील मोरगाव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत यश मिळविले आहे. सन २०२५-२६ हे या शैक्षणिक वर्षात एनएमएमएस परीक्षेत नागनाथ विद्यालय, मोरगाव ता.जि.बीड चे पंधरा विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी खालील सात विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. चि.शिवम पाठक, पृथ्वीराज थोरात, संकेत सांगळे, रणजीत कागदे, कु.संस्कृती वामने, अमृता कागदे, अनुष्का धवन या विद्यार्थ्यांना चंद्रकात चाळक, सखाराम कुडके या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर,युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक राऊत एम.ए., अधीक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य माटे डी.बी., पर्यवेक्षक वाणी बी. एस., यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

# जिल्हापरिषदेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

## जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधीचा हवा तसा वापर :- डॉ.गणेश ढवळे

बीड:-( दि.२५ ) सर्वोच्च न्यायालयाने अनिश्चित काळासाठी राज्यातील उर्वरित जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मर्जी पुढील काही महिने राहणार असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असुन जनतेच्या पैशातून अनावश्यक कामांसाठी निधी देऊन मर्जीतील कंत्राटदार पोसण्याचे काम सुरू असल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत अनावश्यक बाबी ऐवजी अत्यावश्यक बाबींसाठी निधी खर्च करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे सीईओ जतिन रहेमान आणि जिल्हाधिकारी नवनित कांवत यांच्याकडे केली आहे.

मागील काही वर्षांपर्यंत जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने जिल्हा परिषद बांधकाम विभाग या निधीचा हवा तसा वापर करत असल्याचे निदर्शनास येत आहे. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने १० लाख आणि ७ लाख अशा दोन प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. यातील एका कामाचे स्वरूप पंचायत समिती आवारातील अधिकारी कर्मचारी निवासस्थानांची संरक्षण भिंत बांधणे असे आहे.या कामाची रक्कम ९ लाख ९९ हजार ८९५ रुपये इतकी आहे तर जिल्हा परिषद नविन प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व विविध कामे करणे या कामासाठी ६ लाख ८६ हजार २७१ रुपयांची प्रशासकीय मान्यता अर्थात कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

जिल्हा परिषदेत २०२३ पासुन प्रशासक असल्याने

आधिका-यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही.त्यामुळे अधिकारी मर्जीतील कंत्राटदार पोसण्यासाठी निधी खर्च करताना दिसत आहेत. एकीकडे जिल्हा परिषदेच्या मुख्य ईमारतीला संरक्षण भिंत नाही जी होती पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ ती पाडण्यात आली. वास्तविक पाहता ही भिंत तातडीने बांधणे आवश्यक आहे.मात्र असे न करता पंचायत समितीतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाला संरक्षण भिंत बांधण्याचा घाट आधिका-यांनी घातला आहे.

जिल्हा परिषद आवारात ज्या ठिकाणी लाईटचे मीटर आहे त्याठिकाणी एक छोटी फर्निचरची खोली करण्यात येणार आहे.व विविध कामांमध्ये जिल्हा परिषदेच्या गेट समोरील मोकळ्या जागेत तारेचे कंपाऊंड आणि हिरवळ करण्यात येणार आहे मात्र मुळात निवडण्यात आलेली जागाच चुकीची असुन

लोकप्रतिनिधी नसल्याने आणि केवळ प्रशासकीय राज असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असल्याचे दिसून येत असुन संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी याबाबत सीईओ जितिन रहेमान आणि जिल्हाधिकारी नवनित कांवत यांना लेखी तक्रारी द्वारे अनावश्यक बाबी टाळुन आवश्यक त्या ठिकाणी निधीचा वापर करण्याची विनंती केली आहे.

---

# आरटीई पोर्टलवर ७५ शाळांचा तात्काळ पुन:समावेश करावा

## मनोज जाधव यांची मागणी

### पोद्दार शाळेचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुन:समावेश करावा - मनोज जाधव

बीड (प्रतिनिधी)

अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आलेल्या आणि त्यानंतर निर्णय रद्द झालेल्या ७५ शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनःसमावेश करण्यात यावा, अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, शिक्षण मंत्री ,तसेच प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, काही शाळांना अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्याच्या प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली होती. संबंधित शाळांच्या अल्पसंख्यांक दर्जाबाबत यापूर्वीच स्थगिती असतानाही काही तासांत प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणाची दखल घेत माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित निर्णयास स्थगिती दिली आहे.दरम्यान, सध्या राज्यात आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू असून पालकांकडून अर्ज सादर केले जात आहेत. मात्र, नियमबाह्य पद्धतीने अल्पसंख्यांक प्रमाणपत्र देण्यात आलेल्या ७५ शाळांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आले आहेत यात बीड जिल्ह्यातील पोद्दार शाळेचा देखील समावेश आहे. त्यामुळे या शाळेत आरटीई मार्फत आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांना अर्ज प्रक्रियेत अडचणी येत आहेत. अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रक्रियेत नुकसान होत असल्याची बाबही पुढे आली आहे.ज्या तत्परतेने संबंधित शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देऊन त्यांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आली, त्याचप्रमाणे निर्णय रद्द झाल्यानंतर त्या शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुन:समावेश व्हावा, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित विभागास आवश्यक सूचना द्याव्यात, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.आरटीई प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता राखून सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी, हीच या मागणीमागील भूमिका असल्याचे जाधव



बीड : येथील श्रीसंत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठानवर सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात दि २४ फेब्रुवारी रोजी बुलढाणा येथील झी टॉकीज फेम ह.भ. प. सविताताई महाराज केकान यांचे कीर्तन संपन्न झाले. त्यांचे मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानपत्र देऊन आशीर्वाद घेताना डॉ. संजय तांदळे, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, रवींद्र मुंडे, भारत आंधळे, मिसाळ साहेब आदी दिसत आहेत.

# केज मतदारसंघात अवकाळीचा तडाखा; नुकसान भरपाईसाठी आ.नमिता मुंदडा यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

केज विधानसभा मतदारसंघात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी सरकारकडे धाव घेतली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करून त्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांना पत्राद्वारे केली आहे.२२ आणि २३ फेब्रुवारी २०२६ रोजी केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यात अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, बाजरी आणि भाजीपाला पिके अक्षरशः भुईसपाट झाली आहेत. काढणीस आलेली पिके शेतातच आडवी पडल्याने आणि पावसामुळे ओली झाल्याने त्यांची प्रत खालावली आहे.

## शेळगाव गौरी येथे २७ फेब्रुवारी रोजी मोफत आरोग्य शिबिर

### अवकाश पाटील धुपेकर

नायगाव (प्रतिनिधी)

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य विमा योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत नायगाव तालुक्यातील शेळगाव गौरी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांची मोफत तपासणी व मोफत औषधि वाटप तसेच विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय सल्ला देण्यात येणार आहे.तरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन अवकाश पाटील धुपेकर यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये हृदयरोग, किडनी विकार, मधुमेह, कर्करोग, थायरॉईड, रक्तदाब तसेच इतर गंभीर आजारांवरील उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून सदर शिबिरात नांदेड येथिल नामांकित तूकामाई दवाखान्याचे प्रमुख डॉ. दत्तात्र्य काळे साहेब यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून, रुग्णांची तपासणी करून आवश्यक त्या उपचारांची माहिती देण्यात येईल.

हे मोफत आरोग्य शिबिर दि. २७/०२/२०२६ रोजी शुक्रवार सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत छत्रपत्ति राजर्षी शाहु महाराज मगल कार्यालय शेळगाव गौरि येथे आयोजित करण्यात आले असून पंचक्रोशितिल मोठ्या संख्येने नागरिक व माता बंधिनिनी उपस्थित राहुन मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अवकाश पाटील धुपेकर यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पंडित विद्यालयाच्या एन.एम.एम.एस.परीक्षेत ११२ विद्यार्थ्यांची झंझावाती भरारी




महाराष्ट्र पातळीवर अव्वल यश

आष्टी - (राजेंद्र लाड) शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पंडित जवाहरलाल नेहरु प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आष्टी (ता. आष्टी, जि. बीड) येथील विद्यार्थ्यांनी एन.एम.एम.एस. (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षा २०२५-२६ मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयातील तब्बल ११२ विद्यार्थ्यांनी या स्पर्धात्मक परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवत महाराष्ट्र पातळीवर अव्वल कामगिरी नोंदवली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, सातत्यपूर्ण अभ्यास व कठोर परिश्रम यांच्या जोरावर हे यश मिळवले. एन.एम.एम.एस. परीक्षा ही राज्य शासनामार्फत घेतली जाणारी महत्त्वाची शिष्यवृत्ती परीक्षा असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता नववीपासून पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे.

विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडखे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, योग्य नियोजन, नियमित सराव चाचण्या आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळेच हे अभूतपूर्व यश शक्य झाले. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता दडलेली आहे; संधी व मार्गदर्शन मिळाल्यास ते राज्यस्तरावरही चमक दाखवू शकतात.

या यशामागे मार्गदर्शक शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे. विशेषतः ससाणे आर. आर., निकाळजे आर. एस., श्रीमती मेहेर यू. के., श्रीमती ताम्हाणे एस. आर., श्रीमती शिंदे टी. डी., श्रीमती गाडेकर एस. एस. तसेच सेवक संतोष होळकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे सखोल मार्गदर्शन, विशेष सराव सत्रे व प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करून तयारी घडवून आणली. विद्यालयातील ११२ विद्यार्थ्यांच्या या यशामुळे आष्टी तालुक्यात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

संस्थेचे संस्थाध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे, अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे, राजेंद्र धोंडे, पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातून राज्य पातळीवर झेप घेणाऱ्या या विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर यशाचा नवा इतिहास घडवला असून, त्यांच्या या कामगिरीमुळे विद्यालयासह आष्टी तालुक्याचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल झाले आहे.

# शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सांगवी पाटण शाळेत भाषण स्पर्धा




आष्टी - (प्रतिनिधी)

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी पाटण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पहिली ते चौथी (लहान गट) व पाचवी ते सातवी (मोठा गट) अशा दोन गटांमधून एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

लहान गटात अनुष्का राहुल खिलारे हिने प्रथम, स्वानंदी दत्तात्रय खिलारे हिने द्वितीय, सृष्टी राधाकृष्ण राऊत हिने तृतीय तर माहिरा शाहरुख शेख हिने उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. मोठ्या गटात शिवराज ज्ञानदेव खिलारे याने प्रथम, श्रीनाथ निळकंठ खिलारे याने द्वितीय, मयुरी लक्ष्मण कर्डिले हिने तृतीय तर अनुष्का प्रकाश सोनवणे हिने उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.

कार्यक्रमाच्या प्रसंगी शिवरायांचा मुस्लिम मावळा म्हणून ओळखले जाणारे समीर शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वाटप करण्यात आले. समीर शेख यांच्या वतीने प्रत्येकी आठ विद्यार्थ्यांना १०० रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट भाषणासाठी लक्ष्मण कर्डिले यांनी १०० रुपयांचे बक्षीस दिले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक तुकाराम बोराडे, अजिनाथ साखरे, बाळासाहेब पोटे, मच्छिंद्रनाथ देशमुख, श्रीम. वैशाली खकाळ व श्रीम. अनिता राजपूत यांनी विशेष परिश्रम घेतले. बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी कल्याण राऊत, रवि भोसले, सागर भोसले, शिंदे साहेब, बन्सीलाल खिलारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिद्द,चिकाटी आणि कष्टांची पराकाष्ठा

## शिरापूरच्या शेतकऱ्याच्या मुलाची बँक अधिकारीपदी निवड



आष्टी - (प्रतिनिधी) स्वप्न मोठं असावं आणि त्यासाठी जिद्दही तितकीच मोठी असावी, याचा प्रत्यय बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील शिरापूर येथील महेश श्रीराम तागड यांच्या यशातून आला आहे. अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा असलेल्या महेशने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आयबीपीएसमार्फत देशस्तरावर घेण्यात आलेल्या बँकिंग परीक्षेत घवघवीत यश संपादन करून राष्ट्रीयकृत बँकेत अधिकारी म्हणून नियुक्ती मिळवली आहे.

महेश तागड यांचे वडील पारंपरिक शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शेतीतील अनिश्चित उत्पन्न, घरची आर्थिक ओढाताण आणि मर्यादित साधनसामग्री अशा अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी मुलाच्या शिक्षणात कोणतीही तडजोड होऊ दिली नाही. शिक्षण हेच खरे भांडवल या विचारावर ठाम राहून त्यांनी महेशला सातत्याने पाठबळ दिले.

महेशने आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत पूर्ण केले. साध्या वातावरणात शिक्षण घेत असताना त्याने अभ्यासात सातत्य ठेवले. पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याने स्पर्धा परीक्षेचा मार्ग निवडला. बँकिंग क्षेत्रात अधिकारी होण्याचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवून त्याने नियोजनबद्ध अभ्यास सुरू केला. अपयशाची भीती न बाळगता दिवस-रात्र मेहनत घेत अखेर त्याने आयबीपीएस परीक्षेत यश संपादन केले.

आपल्या यशाबद्दल बोलताना महेश तागड भावूक होत म्हणाला, माझ्या वडिलांनी शेतात राबून माझ्या शिक्षणासाठी पैसे उभे केले. आईने नेहमीच मला मानसिक बळ दिले. कुटुंबाच्या पाठिंब्यामुळेच मी हे यश मिळवू शकलो. शेतकऱ्यांची मुलेही मोठ्या पदावर जाऊ शकतात, हे सिद्ध करता आले याचा मला अभिमान आहे.

महेशच्या यशाची बातमी गावात समजताच ग्रामस्थांनी गुलालाची उधळण करत, फटाके वाजवत आनंदोत्सव साजरा केला. गावातील तरुणांनी त्याचे अभिनंदन करत त्याच्याकडून मार्गदर्शनही घेतले. महेशचे हे यश शिरापूरसह परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ज्या जिल्हा परिषद शाळेत महेशने शिक्षण घेतले, त्या शाळेत तसेच ग्रामपंचायत कार्यालय शिरापूर यांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब महाडिक, सर्व शिक्षक वर्ग, सरपंच सोमनाथ गायकवाड, उपसरपंच सचिन काळे, ग्रामसेवक नवनाथ लोंढे, ग्रामसेवक आगाशे साहेब, डॉ. आगाशे, सावनकुमार तागड यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महेश तागड याची ही यशोगाथा जिद्द, चिकाटी आणि कष्ट यांच्या बळावर स्वप्ने साकार होऊ शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# परतूर: चांगतपुरी रेती घाटावर नियमांची पायमल्ली मशीनद्वारे बेकायदेशीर उपसा सुरू

## प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात १ मार्चपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा श्री रामप्रसाद किसनराव थोरात जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी

परतूर ।प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील मौजे चांगतपुरी येथील रेती घाटावर शासनाचे नियम धाब्यावर बसवून गुत्तेदाराकडून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर रेती उपसा केला जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही महसूल प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी केला असून, येत्या १ मार्च २०२६ पासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा निवेदनाद्वारे रामप्रसाद किसनराव थोरात जिल्हा अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, महेश रामेश्वर राव नळगे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हाध्यक्ष जालना,सिद्धेश्वर पांडुरंग सोळंके उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस जालना, पंजाब रामप्रसाद देशमुख सामाजिक कार्यकर्ते, यांनी दिला आहे. तसेच चांगतपुरी रेती घाटाचा लिलाव झालेला असला तरी, प्रत्यक्षात काम करताना अनेक नियमांचे उल्लंघन होत आहे नियमानुसार रेती भरण्यासाठी मजुरांचा वापर करणे अनिवार्य असताना, येथे पोकलेन, जेसीबी आणि बोटींच्या सहाय्याने दिवस-रात्र पात्रातून बेकायदेशीर उपसा सुरू आहे. लिलाव झालेल्या गटामध्ये सध्या पाणी असल्याने रेती उघडी नाही. तरीही पात्रातून अनधिकृतपणे उपसा करून पर्यावरणाचे नुकसान केले जात आहे. तसेच घाटावर जाण्यासाठी बनवलेल्या रस्त्यासाठी हजारो ब्रास मुरूम वापरण्यात आला आहे, ज्याची कोणतीही रॉयल्टी भरलेली नाही. सी.सी.टी.व्ही.चा अभाव: शासकीय नियमानुसार घाटावर सी.सी.टी.व्ही. लावणे गरजेचे असताना, गुत्तेदाराने अद्याप ते लावलेले नाहीत. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी पाहणी करण्याचा प्रयत्न केल्यास, गुत्तेदाराने नेमलेल्या स्थानिक यंत्रणेकडून कार्यकर्त्यांना शिवीगाळ करणे, अंगावर धावून जाणे आणि मारहाण करण्याचे प्रकार घडत आहेत. या सर्व प्रकाराबाबत तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना व्हॉट्सप तसेच भ्रमणध्वनीद्वारे वारंवार कळवण्यात आले आहे. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याने, यात अधिकार्यांचे मेहेरबान असल्याचा संशय कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. पुरावा म्हणून आष्टी बसस्थानक आणि मोंढा ढ पॉईंटवरील गेल्या ८ दिवसांचे सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. या बेकायदेशीर कामावर त्वरित कारवाई न झाल्यास १ मार्च २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे तीव्र उपोषण छेडण्यात इशारा रामप्रसाद किसनराव थोरात जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी जालना, महेश रामेश्वर राव नळगे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हाध्यक्ष जालना,सिद्धेश्वर पांडुरंग सोळंके उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस जालना, तसेच पंजाब रामप्रसाद देशमुख सामाजिक कार्यकर्ता यांनी दिला आहे आंदोलनाची सर्व जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती महसूल मंत्री, विभागीय आयुक्त (छ. संभाजीनगर), जिल्हाधिकारी (जालना), ठढज आणि पोलीस प्रशासनाला पाठवण्यात आल्या आहेत. असं तिन्ही या नियोजनाद्वारे म्हटलं आहे




# पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टीची एनएमएमएसमध्ये घवघवीत कामगिरी

## २८ विद्यार्थीनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ;शाळेची उज्वल यशपरंपरा कायम

आष्टी - (राजेंद्र लाड)

आष्टी येथील पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला, आष्टी या शाळेने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत शाळेची उज्वल परंपरा कायम राखली आहे. जाहीर झालेल्या एनएमएमएस परीक्षेच्या निकालात शाळेच्या तब्बल २८ विद्यार्थीनी पात्र ठरल्या असून संपूर्ण तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

या परीक्षेत गायकवाड सिद्धी अमोल हिने १३० गुण मिळवत अव्वल कामगिरी केली. मानमोडे सिद्धी पांडुरंग (१२१ गुण) व इनामदार पूर्वा दिलीप (११५ गुण) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. धोंडे प्रिया बाळासाहेब (१०८), साप्ते अनुष्का अशोक (१०४), लांबडे आर्या शहाजी (१०३) आणि कुरेशी नेहा मोसिन (१०२) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. इतर यशस्वी विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे - दिंडे सृष्टी राजू (९७), वायकर श्रेयशी संतोष (९५), काकडे पूनम निलेश (९४), मोहिते साक्षी सुनील (९३), हंबर्डे श्रद्धा दादासाहेब (९१), पाखरे कोमल गोकुळ (८८), पोकळे संध्या बाबासाहेब (८६), सायंबर श्रावणी लक्ष्मण (८५), निकाळजे अनुष्का रवी (८५), बडे उर्मिला रामराव (८५), बळे श्रेणीका सचिन (८४), शेंदूरकर अश्विनी महादेव (८४), देशपांडे नताशा नीरज (८२), बेग मरियम रफिक (८१), तवले अंजली रविकांत (८०), भवर शिवानी तुकाराम (७८), जोशी अनुष्का सुजित (७८), निकाळजे हर्षला सचिन (७७), गायकवाड पूजा विठ्ठल (७५), तोडकर स्वामिनी प्रल्हाद (७३) व चटाले प्रतीक्षा धनंजय (७२).

या घवघवीत यशामागे शाळेच्या शिक्षकांचे मार्गदर्शन व विद्यार्थिनींची जिद्द महत्त्वाची ठरली. सामाजिक शास्त्रे विषयासाठी आबासाहेब खताळ व श्रीमती लतिका तरटे मॅडम, बुद्धिमत्ता विषयासाठी देविदास शिंदे व राजेंद्र शेळके, विज्ञान विषयासाठी अप्पासाहेब काळे आणि गणित विषयासाठी दत्तात्रय गाडेकर यांनी विशेष मार्गदर्शन केले. एनएमएमएस विभाग प्रमुख म्हणून देविदास शिंदे यांनी नियोजनबद्ध तयारी करून विद्यार्थिनींना यशाच्या शिखरावर पोहोचवले.

या यशाबद्दल आष्टी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे साहेब, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा श्रीमती सुजाता झगडे मॅडम, उपाध्यक्षा श्रीमती प्रभा वायकर मॅडम, सदस्य लक्ष्मण रेडेकर बापू, डॉ. नदीम शेख तसेच सर्व सदस्य व शिक्षक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून अभिनंदन केले. या उल्लेखनीय यशामुळे पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टीने शैक्षणिक क्षेत्रातील आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली असून भविष्यातही अशीच उज्वल कामगिरी कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वै.थोरवे दादांचा प्रेरणादायी वारसा ॲड.हनुमंत थोरवे व धैर्यशील थोरवे समर्थपणे पुढे नेत आहेत-संजय महाराज पाचपोर

## वै.थोरवे दादा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त भव्य धार्मिक सप्ताह



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी येथे थोर स्वातंत्र्य सेनानी साहेबराव थोरवे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, भागवत मूलसंहिता वाचन पारायण, श्रीमद्भागवत गीता पारायण, होम-हवन यज्ञ तसेच काल्याचे कीर्तन अशा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सप्ताहात मोठ्या संख्येने भाविक, ग्रामस्थ, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सप्ताहातील काल्याच्या कीर्तनात रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी अभ्यासपूर्ण आणि प्रभावी मार्गदर्शन केले.

आपल्या प्रवचनात त्यांनी जीवनातील प्रारब्ध, संस्कार आणि अध्यात्म यांचे महत्त्व स्पष्ट केले. प्रारब्ध हे भोगावेच लागते. प्रपंचात पक्ष्यासारखे असावे. मनुष्यजन्म हा दुर्लभ असून धर्मशास्त्रात त्याचे विशेष महत्त्व सांगितले आहे. जीवनात येणाऱ्या अडचणींना देखील ईष्ट मानून स्वीकारले पाहिजे. आपत्तीला ईष्ट बनवणारेच खरे माणूस असतात, असे ते म्हणाले. महाराजांनी सांगितले की, मनुष्याच्या देहाला सहा प्रमुख विकार असतात आणि त्या विकारांसहच माणूस जन्माला येतो. परंतु संयम, साधेपणा आणि अध्यात्म यांच्या बळावर जीवन अर्थपूर्ण करता येते. फुकट मिळालेल्या गोष्टीचे महत्त्व नसते; कष्टाने कमावलेल्या गोष्टीची किंमत वेगळीच असते, असे सांगून त्यांनी श्रमसंस्कृतीचा पुरस्कार केला.

स्वातंत्र्य सेनानी थोरवे दादांच्या दीर्घायुष्याचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, कलियुगात १२२ वर्षे आयुर्वेदीय तत्त्वांनुसार साधे, संयमी आणि संस्कारी जीवन जगणे हे अत्यंत दुर्मीळ आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारे आयुष्य लाभलेले थोरवे दादा हे एकमेव व्यक्तिमत्त्व असावेत. दादांनी आयुष्यभर राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी, सहकार क्षेत्रातील नेतृत्व, सर्वपक्षीय स्नेहसंबंध आणि अध्यात्मिक विचारांचा पुरस्कार केला, असेही त्यांनी नमूद केले. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगांचे निरूपण करताना विविध दृष्टांत देत महाराजांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. जीवन सुंदर आहे; परंतु ते जगताना अध्यात्माचा सुगंध सोबत असावा. सत्य, सेवा आणि अध्यात्म यांच्या माध्यमातून मनुष्य आनंदी जीवन जगू शकतो. संसारी जरूर असावे; पण त्याहीपेक्षा संस्कारी अधिक असावे, असा संदेश त्यांनी दिला.

सद्यस्थितीवर भाष्य करताना त्यांनी सामाजिक वास्तव अधोरेखित केले. गरीबांची झोप श्रीमंत असते, तर श्रीमंतांची झोप गरीबी असते, असे सांगत त्यांनी पालकसेवेचे महत्त्व स्पष्ट केले. आई-वडिलांची सेवा केली तर कोणत्याही तीर्थक्षेत्री जाण्याची गरज भासत नाही. लाभाशिवाय प्रेम करणारे आई-वडील असतात, असे ते म्हणाले. ज्या घरात आदर आणि प्रेम नाही, त्या घरात जाऊ नये, असेही त्यांनी सांगितले.

समाजातील आर्थिक दृष्ट्या सक्षम व्यक्तींनी आपल्या घराची दारे समाजासाठी खुली ठेवावीत आणि गरजू, दीनदुबळ्या लोकांना सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले. समाजात राहत असल्यामुळे समाजासाठी उपयोगी पडणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. समाजहितासाठी कार्य न करणाऱ्या व्यक्तीला किंमत नसते, असे ते म्हणाले. हिंदू धर्म-संस्कृतीच्या रक्षणाची गरज अधोरेखित करत त्यांनी उत्पन्नातील किमान दहा टक्के रक्कम देश, देव आणि धर्मकार्यासाठी कर्तव्य म्हणून दान करण्याचे आवाहन केले. दान केवळ प्रसिद्धीसाठी नव्हे तर कर्तव्यभावनेतून करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. कीर्तनकार, प्रबोधनकार, राजकीय नेते आणि वैद्यकीय व्यावसायिक यांनी कधीही असत्य बोलू नये, अशी सूचनाही त्यांनी केली. प्रयत्न करूनही काही घडत असेल तर ते प्रारब्धानेच घडते. कोणाचे प्रारब्ध कसे असेल ते सांगता येत नाही, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमात माजी आमदार साहेबराव दरेकर, ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कराळे, राऊतदादा महाराज, रवींद्र महाराज सुडके, कोर्टीकर महाराज, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय गोल्हार, देविदास आबा धस, राजेंद्र धोंडे, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, महेश आजबे, बँक व्यवस्थापक राकेश शाही, विठ्ठल बनसोडे, डॉ. शिवाजी राऊत, झांबरे महाराज, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, राजाभाऊ दरेकर, उद्धव दरेकर, निकुंबे, भानुदास बोडखे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी थोरवे दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. थोरवे दादा सहकार क्षेत्रात अग्रस्थानी होते तसेच सर्वपक्षीय संबंध जपत त्यांनी तालुका व जिल्हा स्तरावर राजकीय व सामाजिक क्षेत्रात नावलौकिक मिळवला होता, असेही गौरवोद्गार काढण्यात आले.

यावेळी माजी आ. साहेबराव दरेकर, विजय गोल्हार, डॉ. शिवाजी राऊत, शंकर देशमुख, उद्धव दरेकर, अण्णासाहेब चौधरी, राऊतदादा महाराज, महेश आजबे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या शेवटी ॲड. हनुमंत थोरवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. थोरवे दादांचा प्रेरणादायी, राष्ट्रनिष्ठ आणि संस्कारक्षम वारसा त्यांचे सुपुत्र ॲड. हनुमंत थोरवे व नातू युवा नेते धैर्यशील थोरवे समर्थपणे पुढे नेत असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सप्ताहामागील मुख्य उद्देश समाजात एकात्मता, सद्भावना व संस्कार वृद्धिंगत करणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## छत्रपती संभाजी राजे विद्यालयाच्या परीक्षा केंद्राला गटशिक्षणाधिकारी यांची भेट

मंठा । प्रतिनिधी

दहावीच्या सार्वजनिक परीक्षेला शुक्रवार, दि. २० पासून सुरुवात झाली असून पहिलाच मराठी विषयाचा पेपर छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडला. पेपरदरम्यान कोणताही गैरप्रकार आढळून आला नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.या परीक्षा केंद्राला मंठा येथील गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांनी भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी केंद्रप्रमुख शिवाजी देशमुख, कारभारी



ढाकणे आदी उपस्थित होते.परीक्षा तणावमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी प्रत्येक वर्गखोलीत तसेच शाळा परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. याबाबतची माहिती केंद्र संचालक इर्शाद खान खान पठाण यांनी दिली.दरम्यान, मंठा पोलीस स्टेशन यांच्या वतीनेही परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## मंठा तालुक्यात स्वतंत्र स्मशानभूमीच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे निवेदन

मंठा ।प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील केंधळी, पाकणी, वीरगव्हाण, किर्तापूर व एरंडेश्वर या गावांना स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित गावांमध्ये आजपर्यंत स्वतंत्र स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याने ग्रामस्थांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात व आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना



अधिक त्रास सहन करावा लागतो. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे उलटूनही स्मशानभूमीसाठी जागा निश्चित करण्यात आलेली नसल्याची खंत व्यक्त करत हा प्रश्न मानवी हक्कांशी संबंधित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयास अ+ दर्जा

### जालना जिल्ह्यात शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड

जालना ।प्रतिनिधी

राज्यातील शैक्षणिक गुणवत्तेला दिशा देणाऱ्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा डट--ऋ अंतर्गत अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयाने अ+ दर्जा पटकावत जालना जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा खोवला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी गुणवत्ता मूल्यांकन प्रणाली राबविण्यात आली. या प्रक्रियेत राज्यातील तब्बल १,०२,६७५ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला तर उत्कृष्ट गुण प्राप्त करणाऱ्या १०,६४४ संस्थांचे बाह्य मूल्यांकन करण्यात आले. त्यातून केवळ ४२९ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अ+



दर्जा प्रदान करण्यात आला असून त्यामध्ये अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयाचा गौरवास्पद समावेश झाला आहे.

विशेष म्हणजे जालना जिल्ह्यातील अ+ दर्जा प्राप्त करणाऱ्या केवळ पाच संस्थांमध्ये या महाविद्यालयाचा समावेश झाला असून ही कामगिरी जिल्ह्याच्या शैक्षणिक इतिहासात उल्लेखनीय ठरली आहे. गुणवत्ता शैक्षणिक उत्कृष्टता, प्रशासन व व्यवस्थापन कौशल्य यांचा आदर्श निर्माण करत या महाविद्यालयाने शिक्षण क्षेत्रात नवे मानक प्रस्थापित केले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे यांच्या नेतृत्वाखाली तसेच समन्वयक प्रा. रामप्रसाद भालेकर यांच्या नियंत्रणाखाली सर्व प्राध्यापक व मानक प्रमुखांच्या सामूहिक प्रयत्नातून हे नेत्रदीपक यश साध्य झाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. राजेश टोपे, सचिव सौ. मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सह प्रशासकीय अधिकारी श्री राहुल भालेकर, तसेच उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, डॉ. सीमा निकाळजे, डॉ. रामदास वैद्य, डॉ. कार्तिक गावंडे, डॉ. पंडित रानमाळ, ग्रंथालय प्रमुख डॉ. तुकाराम गजर, कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण, लिपिक मदन तारडे, ज्ञानेश्वर पवार यांनी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयाने मिळवलेला हा अ+ दर्जा केवळ संस्थेसाठी नव्हे तर संपूर्ण जालना जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

### जामखेडचा दुहेरी झेंडा

## जि. प. प्रशाला २० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र मत्स्योदरी विद्यालयाची विद्यार्थिनीही चमकली

जामखेड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जामखेड येथील शैक्षणिक क्षेत्रासाठी यंदाचा राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल अभिमानास्पद ठरला आहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना छचचड परीक्षेत जिल्हा परिषद प्रशाला जामखेड येथील तब्बल २० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून मत्स्योदरी विद्यालय जामखेड येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कु. प्रथा लक्ष्मण वैद्य हिनेही उल्लेखनीय यश मिळवत जामखेडच्या शैक्षणिक लौकिकात भर घातली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या बळावर मिळवलेले हे दुहेरी यश संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

जिल्हा परिषद प्रशाला जामखेड ने यंदा विक्रमी यशाची नोंद केली. मुख्याध्यापक रामप्रसाद शेळके यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांनी विशेष



मार्गदर्शन अतिरिक्त तासिका व सराव परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची पद्धतशीर तयारी करून घेतली. अंबिलवादे के.आर., ढील्पे के.ए., काळबांडे डी.एस., किवंडे, कदम, खडके, सहेजराव, जाधव, आष्टेकर, तुपे, पुंड व सूर्यवंशी या शिक्षकांनी सातत्याने परिश्रम घेत विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेसाठी सक्षम केले.

या शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थी श्रेया प्रमोद जाधव (१२५), अनुष्का गणेश जाधव (११६), रेणुका शेषनारायण जाधव (१००), यश परमेश्वर शेरकर (९९), श्रुती गणेश जाधव (९९), श्रावणी रामनाथ शेळके (९४), समृद्धी ज्ञानेश्वर जाधव (८९), गौरवी संभाजी सांगुळे (८८), कल्याणी साखाराम सांगुळे (८६), आलोक प्रल्हाद देशमुख (८६), सायमा सलीम तांबोळी (८३), साक्षी राम घोरपडे (८२), कार्तिक शेषराव कनाखे (८०), चैताली नवनाथ बनकर (७९), माही अमित मोहिते (७९), प्रांजल ज्ञानेश्वर म्हस्के (७५), गौरी भारत जाधव (७५), गायत्री दत्ता शेजुळ (७४), आकांक्षा उमेश जयस्वाल (७२) व वैष्णवी भगवान धुळे (६७) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

दरम्यान, मत्स्योदरी विद्यालय जामखेड येथील कु. प्रथा लक्ष्मण वैद्य हिनेही छचचड २०२६ परीक्षेत यश मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले. मुख्याध्यापक अरुण ठेंग यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री तांबे, योगेश कव्हळे, रवींद्र पिराणे, बद्रुद्दीन शेख, कैलास कंटुले, उद्धव वाघ, विठ्ठल लोंढे, महादेव नाडे, राजू शिंगाडे, भाऊसाहेब तांगडे, कृष्णा पवार, सतीश भाडमुखे, कैलास पाटील, राजू जाधव, ज्ञानेश्वर जाधव व ज्ञानेश्वर कुंडकर या शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षांबाबत वाढती जाणीव, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे जामखेडने यंदा छचचड मध्ये दुहेरी झेंडा फडकावला आहे. भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी घडत राहावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नाथभक्तांना दादागिरी करत अवैध वाहनतळ कर वसुली चालुच....!

पैठण ।प्रतिनिधी

याबद्दल सविस्तर बातमी अशी आहे की ऐतिहासिक वास्तू पैठण येथील शांति ब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी तथा दशक्रियासाठी आलेल्या तमाम जिल्हा बाहेरील, तालुका खेडोपाड्यातील वारकरी संप्रदायातील भावी भक्त, विदेशी पर्यटकांना खंडोबा मंदिर परिसर वाहनतळात पार्किंगच्या नावाने बनावट पावत्या देऊन दादागिरी करत पैसे उकळल्याने त्यांना संताप व्यक्त होत आहे, हि बाब पैठण तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार विकास महर्षी आमदार विलास बापु भुमरे यांना कळल्याने त्यांनी नाथषष्ठी पार्श्वभूमीवर नाथ मंदिरामध्ये विशिष्ट आढावा बैठक घेऊन विविध विषयांवर चर्चा करून सध्या सुरू असलेल्या अनाधिकृत वाहनतळावर कारवाई करून हे अवैध वाहनतळ कर वसुली बंद करण्यात यावे , असे संबंधित नगरपालिका प्रशासनाच्या अधिकारी, पोलीस प्रशासनाला सागुनही ह्या गंभीर विषयावर कोणाचेही लक्ष नाही असे स्पष्ट दिसत आहे. काही अडदंड प्रवृत्तीच्या




लोकांनी श्री दोलेश्वर मंदिर ट्रष्ट पैठण, संत एकनाथ वाहनतळ , संत एकनाथ मल्टिसर्विसेस या नावाने बनावट पावती तयार करून श्री संत एकनाथ महाराजांच्या समाधी दर्शनासाठी दूरवरून आलेल्या वारकरी संप्रदायातील भावी भक्त , पर्यटकांना ,तसेच दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पैठणच्या गोदाकाठी मृतकांची दशक्रिया विधी करण्यासाठी असंख्य दुख्खीत -पिडीत पैठण शहरात येतात,परंतु दादागिरी करत खुले आम, जबरदस्तीने त्याच्या कडून रस्त्यात गाड्या अडवून पार्किंग साठी पैसे उकळले जात आहे, प्रत्येक वाहनाकरिता किमान ५० रूपये दराप्रमाणे कर वसूल केला जातो. श्री संत एकनाथ षष्टी जवळ येते, तशी भाविकांची प्रचंड गर्दी पैठण येथे होत असते, साधारणत:रोजच्या २०० ते २५० लहान मोठ्या, खासगी, शसकिय बसेस व कार वाहनांमध्ये नाथांच्या चरणी ,भाविक नतमस्तक होण्यासाठी येतात, मग पैशांच्या तुलनेत दर रोज दहा हजार ते बारा हजार रुपयांची उलाढाल या पार्किंगच्या नावाने होत आहे,या बेकायदेशीर चालू असलेल्या पार्किंगच्या नावाने लुटण्याचा ,नाथभक्त भाविकांना दादागिरी करत अवैध वाहनतळ कर वसुलीचा धंदा बंद करण्यात यावा, अशी सर्व वारकरी संप्रदायातील भावी भक्त भाविकांची मागणी आहे असे रिपब्लिकन वार्ता महाराष्ट्र न्युजच्या पैठण प्रतिनिधींशी बोलताना जालना येथील आलेल्या उच्च शिक्षक भाविकाने स्पष्टपणे भुमिका मांडली, त्यांच्यावर झालेल्या १५ दिवसापूर्वी जिल्हा परिषद शाळेची सहली घेऊन आले, तेव्हा अशीच पार्किंगच्या नावाने पैठण वाहनतळात लुटमार करण्यात आली,तो प्रसंग सांगुन पैठणच्या आमदारांना आणि प्रशासनाला पैठण वाहनतळात खुले आम होत असणाऱ्या पार्किंगच्या नावाने लुटमार बंद करण्यासाठी कळकळीने विनंती केली. ह्या बाबतीत सखोल चौकशी व पाहणी केली असता त्या ठिकाणी काही लोकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी, अधिक पैसे कमवण्याच्या उद्देशाने ही अवैधरित्या वाहनतळ पार्किंग सुरू केली असून हाताखाली दोन / तीन कामगार ठेवले आहे. श्री संत एकनाथांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणाऱ्या भाविकांची अशीच जर वाहनतळात पार्किंगच्या नावाखाली लुटमार होत असेल तर यापुढे पैठणमध्ये भावि भक्त कमी प्रमाणात येतील, आणि यात्रा उत्सव संपुष्टात येईल, ह्या सामान्य जनतेचे शोषण करून नफा घेणाऱ्या लुटमार अर्थ व्यवस्थेवर कारवाई कोण करणार? अशी पैठण येथील नागरिकांमध्ये विशेष करून चर्चा सुरू झाली आहे.

## सेवानिवृत्त सैनिक दत्ताराव मोरे यांची मंठा शहरातून भव्य मिरवणूक

### 'भारत माता की जय'च्या घोषणांनी दुमदुमला आसमंत



तळणी वार्ताहर : सैन्य दलात तब्बल ३१ वर्षे सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले देवठाणा (मंठा) येथील सैनिक दत्ताराव विठ्ठलराव मोरे यांचा मंगळवार (ता. २४) रोजी मंठा शहरातून भव्य मिरवणुकीद्वारे सत्कार करण्यात आला. 'भारत माता की जय'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर देशभक्तीच्या उत्साहात दुमदुमून गेला.

मिरवणुकीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी शिवस्मारक समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक सचिन बोराडे, नगरसेवक उबेद बागवान, राजेश खंदारे, दीपक बोराडे, नारायण दवणे, स्वीकृत नगरसेवक सतीश बोराडे, शरद मोरे, अली कुरेशी, भिमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले,सरपंच संघटनेचे मंठा ता. अध्यक्ष अमोल मोरे, उपसरपंच रामराव केशवराव काकडे, चेअरमन सुदाम उद्धवराव काकडे, ग्रामपंचायत सदस्य विठ्ठलराव मोरे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवठाणा (मंठा) गावातील एकूण सहा जणांनी भारतीय सैन्यात सेवा बजावली असून सर्वजण सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामध्ये गंगाधर दादाराव गायकवाड, सुरेश अंबादासराव मोरे, हरिभाऊ दत्ताराव मोरे, परमेश्वर किसनराव खराबे, विठ्ठल माधवराव मोरे आणि दत्ताराव विठ्ठलराव मोरे यांचा समावेश आहे. गावातील या सैनिकांच्या कार्याचा नागरिकांनी अभिमान व्यक्त केला.मिरवणुकीदरम्यान मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होती.देशसेवेसाठी आयुष्याची तीन दशके अर्पण करणाऱ्या दत्ताराव मोरे यांच्या स्वागताने मंठा शहरात देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# पीएम श्री आष्टा(ह.ना.)शाळेचा जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत दुहेरी विजय

आष्टी - (राजेंद्र लाड)

शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत आष्टी तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण या शाळेच्या मुलांच्या व मुलींच्या खो-खो संघाने दणदणीत विजय संपादन केला. दोन्ही संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर एकतर्फी मात करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या अभूतपूर्व यशामुळे आष्टी तालुक्याची क्रीडा क्षेत्रात मान उंचावली असून खो-खोमध्ये दोन्ही विजेतेपदे मिळवण्याचा मान आष्टीला मिळाला आहे.

दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड जिल्हा क्रीडा संकूल मैदान येथे या स्पर्धेचे उद्घाटन पार पडले. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर, उपशिक्षणाधिकारी सय्यद अंजूम, अधीक्षक रंगनाथ राऊत, आबासाहेब घायाळ, क्रीडा अधिकारी विद्यागर साहेब, आष्टीचे गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, यादव फल्लेवाड साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

मुलांच्या खो-खो संघात कर्णधार विराज परसराम आंधळे याच्या नेतृत्वाखाली ऋतिक संतोष घोडेस्वार, आदित्य पोपट खंदारे, ईश्वर विष्णू घोडके, महेश तात्यासाहेब माळवे, समर्थ संजय शिंदे, गौरव जयसिंग आंधळे, तेजस राजेंद्र शिंदे, ओम नामदेव आंधळे, आयुष्य सुशील राऊत, सौरभ बिभीषण गळगटे आणि अजय मधुकर गोपाळघरे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत संघाला विजयी केले. मुलींच्या संघात कर्णधार कु. तनुजा नागेश पठाडे हिच्या नेतृत्वाखाली पंकजा सुनील आंधळे, समीक्षा संदीप रणसिंग, अक्षरा माधव गळगटे, प्रांजली



संतोष रणसिंग, सायली प्रदीप रणसिंग, वैष्णवी श्रीकृष्ण गळगटे, अक्षरा गणेश गळगटे, प्रांजल सिद्धार्थ रोकडे, समृद्धी राजेंद्र भवर, वैष्णवी ब्रह्मदेव आंधळे आणि सोनाक्षी संदीप रणसिंग यांनी दमदार कामगिरी करत जिल्हा विजेतेपद पटकावले.

विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण सराव, चिकाटी, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी बजावली. संघाला शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे तसेच उमेश झांबरे, बापू शिंदे, सोमनाथ वाळके, अरुण पवार आणि श्रीम. हेमलता तरटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, माजी मुख्याध्यापक मच्छिंद्रनाथ जगताप, नामदेव भिसे, पांडुरंग खोकले, उमेश झांबरे, सोमनाथ वाळके, अर्जुन खंडागळे, विजय महाद्वार, श्रीम. हेमलता तरटे, बापू शिंदे, लक्ष्मण खंदारे, परमेश्वर बोडखे, श्रीम. सुनंदा बांगर, श्रीम. सुषमा जाधव, अरुण पवार, शिवाजी कोल्हे आणि अशोक रणसिंग या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल मराठवाडा भूषण आ. सुरेश धस, आष्टा जिल्हा परिषद गटाच्या सदस्या श्रीम. अश्विनीताई अमर निंबाळकर, गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, ज्येष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी मनोरंजन धस, श्रीम. सिमाताई काळे, केंद्रप्रमुख धर्मनाथ शिंदे, केंद्रीय मुख्याध्यापक मधुकर गळगटे, सरपंच श्रीम. दैवशाला गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ गळगटे, संजय पठाडे, हनुमंत कन्हेरे व इतर सर्व सदस्य, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेश कुमार शिंदे, मुख्याध्यापक नंदकिशोर होगाडे, पद्मनाथ गर्जे, शशिकांत खाडे, विशाल चव्हाण, आजिनाथ पाचे, अशोक पठाडे तसेच ग्रामपंचायत सदस्य व विविध मान्यवरांनी अभिनंदन करून कौतुक केले. या दुहेरी विजयामुळे शाळेचे नाव जिल्हास्तरावर झळकले असून संपूर्ण तालुक्यातून विजयी संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# किनवटमध्ये अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान; हेक्टरी ५० हजार भरपाईची मागणी

किनवट (प्रतिनिधी)

तालुक्यात दिनांक २३ व २४ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील मका, गहू तसेच आंबा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) च्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, किनवट झेनिथ चंद्र दोनतुला यांना निवेदन देण्यात आले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती बेबीताई नाईक यांच्या नेतृत्वाखाली तालुकाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड यांच्यासह शिष्टमंडळातील नेत्यांच्या उपस्थितीत दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, डोंगरगाव (चि.), दिग्रस, चंद्रपूर, सावरी, शिवणी (चि.) थारा, माळकोल्हारी तसेच इतर गावांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. यामुळे शेतातील मका व गहू पिके आडवी पडून मोठे नुकसान झाले असून आंबा बागांनाही फटका बसला आहे.

यावर्षी पावसाळ्यात सततच्या पावसामुळे खरीप पिकांचे नुकसान झाले होते. त्यानंतर रबी हंगामात मका व गव्हाची मोठ्या प्रमाणात पेरणी करण्यात आली होती. पिके चांगली उभी असतानाच अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे तात्काळ पंचनामे करून शासनाने हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच सर्व शेतकऱ्यांच्या शेतीबांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित मदत जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली.


यावेळी श्रीमती बोबीताई प्रदीपजी नाईक, ड. राहुल नाईक, बंडूसिंग नाईक, गजानन पाटील सोळंके, माजी सभापती अनिल पाटील कऱ्हाळे, हसनलाला (उपनगराध्यक्ष, किनवट नगर परिषद), जाहिरोद्दीन खान, नगरसेवक अभय महाराज, शामराव भुरके गुरूजी , लक्ष्मण पाटील देशमुख, श्रीराम मेंढे, धर्तीनाथ वागतकर, परमेश्वर मेंढे, पांडुरंग मेंडके, प्रेमसिंग साबळे, युवराज हुरदुके, तुकाराम मेंडके, संतोष खुडे, तुकाराम साबळे, सतीश डोईफोडे, नागेश डवरे आदी उपस्थित होते.

# बिलोलीत अवैधरीत्या मटका जुगार जोमात पोलीस यंत्रणा कोमात ?

## अवैध धंद्यावर प्रशासनाची लगाम लागणार का ?

बिलोली (प्रतिनिधी)

बिलोलीत अवैधरीत्या मटका जुगार जोमात पोलीस यंत्रणा कोमात ? या अवैध धंद्यावर प्रशासनाची लगाम लागणार का ? बिलोली शहरा सह अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे मटका जुगार अवैध वाळू उपसा यासह अनेक व्यवसाय खुले आम राजरोस पणे चालत आहेत मात्र या सर्व बाबी पोलीस प्रशासनाला माहिती असूनही या वर नियंत्रण का नाही तेरी भी चुप मेरी भी चुप असाच प्रकार नित्य निमाने चालु असल्याचे दिसून येते मात्र प्रशासनाचे डोळे उघडे कधी होणार उघडा डोळे बघा निट म्हणी प्रमाणे दिसतो . या परिसरातील सर्व सामान्य नागरीकांचे म्हणणे आहे कि हे अवैध व्यवसाय कायमस्वरूपी बंद केले पाहिजे कारण मटका चालकांच्या



गैरव्यवहारावर अंकुश लावण्यासाठी प्रशासन काय कारवाई करेल

फक्त बिलोली परिसरातील सर्व सामान्य शेतकरी मोल मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत आहे बिलोली परिसरामधील शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे कारण शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणते उपाय योजले जात आहेत? शेतकरी सुखी तर जग सुखी ही घोषणा फक्त भाषणापुरतीच राहिली आहे का? ही घोषणा केवळ भाषणातच राहिली आहे का, याचा अर्थ शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सरकारने अनेक योजना राबविल्या जात आहेत मात्र बिलोली तील अनेक शेतकरी हे मटका जुगार या मुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात संसार उध्वस्त होत चालले असून पोलीस प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन हे अवैध रित्या चालणारे मटका जुगार पुर्ण पणे बद व्हावेत असे सर्व सामान्य नागरीक शेतकरी यांचे म्हणणे असून पोलीस प्रशासनाने या वर काय कार्यवाहि करणार या कडेच बिलोली करांचे लक्ष लागले आहे .



# 'स्वारातीम विद्यापीठात 'सेक्युलरिझम'वर विशेष व्याख्यान

नांदेड (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'राज्यघटनेतील सेक्युलरिझमचा अर्थ' या विषयावर महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांचे विशेष व्याख्यान आयोजित होत आहे. हे व्याख्यान दि.२६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी १२ वाजता विद्यापीठातील सामाजिकशास्त्र संकुलात होईल, अशी माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली.प्रा. शेषराव मोरे यांनी नुकतेच भारतीय संविधानातील सेक्युलरिझमवर ग्रंथ लिहिला असून, या व्याख्यानात त्यांचे मौलिक विचार ऐकण्याची दुर्मीळ संधी मिळेल. या व्याख्यानसत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मनोहर चासकर असतील. प्र-कुलगुरू प्रा. अशोक महाजन आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. दिलीप चव्हाण यांनी केले आहे.

# तूर हमीभाव नोंदणीला २४ मार्च पर्यंत मुदतवाढ...!!

अर्धापूर (प्रतिनिधी): तालुक्यासह जिल्ह्यातील सर्व तूर उत्पादक शेतकरी बांधवांना कळविण्यात येते की, हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर पिकाची शासकीय हमीभावाने (एम.पी.एसपी) खरेदी करण्यासाठी सुरू असलेल्या ऑनलाईन नोंदणीची मुदत आता २४ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली असल्याची माहिती कृऊबासने दिली आहे.

बाजारपेठेतील तुरीचे दर आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे. ज्या शेतकरी बांधवांची नोंदणी तांत्रिक कारणास्तव किंवा इतर कारणांमुळे राहून गेली होती, त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. यासाठी चालू वर्षाचा ७/१२ उतारा (तूर पिकाची नोंद असलेला), आधार कार्डची छायाप्रत, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत (बँक खाते आधारशी लिंक असणे अनिवार्य), मोबाईल नंबर (ओटीपी पडताळणीसाठी) व जुनी मुदत २० फेब्रुवारी २०२६ (संपुष्टात आली होती). नवीन मुदत २४ मार्च २०२६ पर्यंत नजीकची शासकीय खरेदी केंद्रे किंवा अधिकृत ऑनलाईन पोर्टल वर करावी.

नांदेड जिल्ह्यातील एकही तूर उत्पादक शेतकरी नोंदणीपासून वंचित राहू नये, हा शासनाचा मानस आहे. तरी सर्व पात्र शेतकऱ्यांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता तातडीने आपली ऑनलाईन नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून आपल्या मालाला योग्य हमीभाव मिळेल असे आवाहन नांदेड कृऊबाचे सभापती संजयराव देशमुख लहानकर, उपसभापती भुजंग पाटील, सचिव मानिकराव बारसे यांनी केले आहे.

# रविंद्रनाथ टागोर शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम व पालक मेळावा संपन्न

कंधार(प्रतिनिधी)

रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा कंधार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते , यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रप्रमुख माधव कांबळे व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पुजनाने करण्यात आले.

यावेळी नगरसेवक दिलीप पवार ,नगरसेवक दिलीप देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य उत्तम चव्हाण, खाजगी शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष



भास्कर कळकेकर,संस्थेचे सचिव तथा भाजपा मंडळ अध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार, मुख्याध्यापक बसवेश्वर मंगनाळे, दिगंबर वाघमारे, मोहम्मद अन्सारुद्दीन ,हरिहर चिवडे , जमीर, यन्नावार शिवण, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव यन्नावार,शिवकुमार बच्चेवार,पत्रकार महंमद सिकंदर, राजेश्वर कांबळे, माधव भालेराव, शुभम केंद्रे,अविनाश कदम, रमाताई कठारे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सिंधुताई यन्नावार, मुख्याध्यापक सुभाष मुंडे यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

या वर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम ही महाराष्ट्राची लोककला ही होती यामध्ये लावणी, भारुड, वासुदेव, पोवाडा, गोंधळ, तमाशा अशा पारंपरिक लोककलांचा समावेश होता विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट नृत्याविष्काराने या लोककला सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. प्रास्ताविक गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले तर सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन एकनाथ तिडके यांनी केले.

# 'स्वारातीम' विद्यापीठात गुणवंत खेळाडू व समिती सदस्यांचा सन्मान

नांदेड जिल्हा (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दिनांक २४ फेब्रुवारी रोजी अधिसभा सभागृह मध्ये राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा भव्य गौरव सोहळा पार पडला. साउथ-वेस्ट विभागीय, पश्चिम विभागीय तसेच ऑल इंडिया आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून विविध पारितोषिके मिळवून देणाऱ्या खेळाडूंना, प्रशिक्षकांना व संघ व्यवस्थापकांना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

याच सोहळ्यात नुकत्याच यशस्वीरित्या पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०२५ च्या आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या विविध समित्यांच्या प्रमुखांचाही सत्कार करण्यात आला.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र दादा चव्हाण, डॉ. सुर्यकांत जोगदंड, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने यांच्यासह अधिसभा सदस्य डॉ. महेश बेंबडे उपस्थित होते.

कार्यक्रमात ज्युडो, तलवारबाजी, तायक्वांदो, टेबल टेनिस, खो-खो, कबड्डी आणि बास्केटबॉल या क्रीडा प्रकारांमध्ये यश मिळवणाऱ्या ओम हिंगमिरे, ज्ञानेश्वरी शिंदे, स्वप्नाली घेमुंड, प्रणव अडबलवार, अमिष आठवले, आयुष आठवले, कैवल्य गिरगावकर, तुषार जाधव, ओमकार बारहाते, रामचंद्र झोरे, शुभम थोरात, शुभम उत्तेकर, ओमकार सोनवणे, निहार दुबे, सौरभ अडवकर, संकेत सुपेकर, प्रेम रणदिवे, नितीन खटिंग, शुभम शिगवण, सोफिया शेख, अनिकेत चीद्रावार, ज्ञानेश्वर कावळे, गजानन भालटकर, गणेश कचकुळे, दत्ता शिंदे, सागर गायकवाड, आकांक्षा राठोड, गौरी दाहे, आरती शहा, प्रेक्षा पाटील, अमृता दिवसे, अनुराधा जाधव, अरुणा पोवार, प्राची लोहार, सानिका पाटील, सानिका संजय पाटील, संध्या पिंपळे, गीता तुरे, प्रगती कांबळे, साक्षी समसापुरे, कांचन सूर्यवंशी, मुक्ताई राऊत, नम्रता पवार, वैष्णवी जाधव, राधा कांबळे, प्रीती धनगेर, साधना पवार, प्रांजल मुगळे, ज्योती पवार, लक्ष्मी राठोड, सपना पैठणे, राजेश्वरी वाघमारे, गायत्री वाघ आणि पल्लवी पुतळे या खेळाडूंना



सन्मानित करण्यात आले. तसेच संबंधित प्रशिक्षक व संघ व्यवस्थापकांनाही गौरविण्यात आले.

याप्रसंगी डॉ. महेश वाकरडकर, डॉ. मीनानाथ खोमचाळे, डॉ. तातेराव केंद्रे, डॉ. सचिन चामले, डॉ. पवन पाटील, डॉ. अशोक वाघमारे यांच्यासह अनेक प्राचार्य व क्रीडा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील वाढत्या यशाचा गौरवशाली टप्पा ठरला.

# भोकरदन बसस्थानक परिसरात पोलीस चौकी स्थापन..!!

भोकरदन :शहरातील शाळा व महाविद्यालय परिसर तसेच बसस्थानकात टवाळखोरांमुळे विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत असल्यामुळे याचा बंदोबस्त करण्यासाठी बसस्थानक परिसरात तात्काळ पोलीस चौकीची स्थापना करावी अशी मागणी मा.आ.चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सौ अनिताताई जाधव यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल व पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्याकडे केली होती. त्याची तात्काळ दखल घेण्यात आली असून रविवारी २२ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष पोलीस चौकी स्थापन करण्यात आल्याने सौ जाधव यांच्या मागणीला यश मिळाले आहे. दरम्यान, सौ अनिताताई जाधव यांनी पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक व दामिनी पथक तसेच संपूर्ण पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहे.शहरात काही दिवसापूर्वी शालेय मुलीची छेड




काढण्याचे प्रकरण घडल्यानंतर भोकरदन शहरात दामिनी पथकाची स्थापना करून मुलींना संरक्षण देण्यात यावे व बसस्थानक परिसरात पोलीस चौकीची स्थापना करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अनिताताई जाधव यांनी केली होती.त्या संदर्भातील विविध वर्तमानपत्रात बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या.आणि त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार जालना येथील दामिनी पथक भोकरदन मध्ये दाखल होऊन पथकाने तक्रारदार सौ अनिताताई जाधव यांना सोबत घेत शहरातील न्यू हायस्कूल गाठत तेथे विद्यार्थिनींची बैठक घेऊन त्यांचे समोपदेशन करताना टवाळखोर मुलांवर कठोर कार्यवाही करणार असल्याचे सांगितले होते .दरम्यान, प्रथम पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक किरण बिडवे व दामिनी पथकाने सौ अनिताताई जाधव यांच्यासोबत टवाळखोर व त्यावरील कारवाई बाबत चर्चा केली होती तेव्हाच सौ जाधव यांनी बसस्थानक परिसरात पोलीस चौकीची मागणी केली होती. मागणीची दखल घेऊन पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनीही वरिष्ठ स्थरावर पाठपुरावा करून पोलीस चौकी मंजूर करून घेतली. दरम्यान, रविवारी २२ फेब्रुवारी रोजी दुपारी बसस्थानक परिसरात पोलीस मदत केंद्र स्थापनही झाले आहे. भोकरदन शहरात ग्रामीण भागातून शिक्षणासाठी मोठया प्रमाणात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी विविध शाळा व महाविद्यालयात दररोज येत असतात. शाळा व महाविद्यालय सुरु होण्याच्या व सुट्टीच्या वेळी विद्यार्थिनींचा पाठलाग करून छेड काढण्याच्या घटना शहरात घडत असून अशा घटनामुळे मुलींच्या शिक्षणात अडथळा निर्माण होत आहे. तर काही मुली अशा घटनामुळे व्यथित होऊन शिक्षण सोडण्याच्या मानसिकतेत असून पालकांतूनही याबाबत नाराजीचा सूर उमटत होता.आपल्या मुलींना शिक्षणासाठी पाठवावे की नाही या विवंचनेत बरेच पालक असल्याचे दिसून येत असल्याचे शाळेतील शिक्षक ही सांगत होते हे विशेष.




# मत्स्योदरी विधी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात लोक अदालत व वाद निवारण उपक्रम

जालना ।प्रतिनिधी

मत्स्योदरी विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य केंद्राच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालत व तडजोडीने वाद निवारण या विषयावर तांदुळवाडी येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन व मार्गदर्शन नितेश बंडगर, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांनी केले.लोक अदालत गावपातळीवर शांततेचा मार्गया प्रसंगी ड. महेश वाघुंडे, मुख्य लोक अभिरक्षक यांनी प्राचीन काळात गावातील पंच लोक एकत्र बसून वाद निवारण करत असत हीच परंपरा लोक अदालतच्या माध्यमातून आधुनिक स्वरूपात यशस्वीपणे राबवली जात असल्याचे सांगितले. बांधावरून होणारे छोटे वाद गावपातळीवर सामंजस्याने सोडवून गावात शांतता टिकवण्याचे आवाहन त्यांनी केले.

ड. मौजुद शेख, सहाय्यक लोक अभिरक्षक यांनी कायदा शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत कायद्याचे ज्ञान हीच खरी शक्ती आहे असे प्रतिपादन केले.न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढविण्याचा उपक्रमजि.प. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कुलकर्णी एस. बी. यांनी या उपक्रमामुळे न्यायव्यवस्थेबाबत लोकांच्या मनात निर्माण झालेली नकारात्मक प्रतिमा दूर होऊन पुन्हा विश्वास व आदर निर्माण होईल असा आशावाद व्यक्त केला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेख टी. वाय. यांनी प्रास्ताविकात लोक अदालत हा असा मंच आहे जिथे कोणाचाही पराभव होत नाही तर न्याय मिळतो म्हणून ही पर्यायी न्यायव्यवस्था प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.बाल विवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत प्रभावी पथनाट्यकार्यक्रमात विधी सहाय्य केंद्राच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या बाल विवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांनी वय खेळण्याचं शिक्षा आयुष्यभराची या सामाजिक समस्येवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करून उपस्थित ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली.यावेळी आनंद भिसे, सरपंच तसेच गणेश भिसे,अध्यक्ष, तंटामुक्त समिती यांनीही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. हंगरगे एस. डी. यांनी केले तर आभार प्रा. देशमुख एस. व्ही. यांनी मानले.यावेळी प्रा. गोरे एस. जे., प्रा. पवार आर. पी., प्रा. जोशी व्हि. एस., प्रा. शेख एच. एम., कोकने सी. यू. यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी, विद्यार्थिनी व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.